# श्री साईलीला



स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासु सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

सहज बोलतां बोलतां कांहीं कारण नसतां दुसऱ्यांची निंदा, नालस्ती करूत स्वतःची जीभ विटाळण्याची पुष्कळांस खोड असते. अहो! शहाणेसुर्ते, पदवीधर व पंडित समजले जाणारेही परनिंदेच्या मोहास बळी पडतात मग इतरांचें काय सांगावें? हा दुर्गुण एखाद्यांत आढळून आला असतां बाबा तात्काळ त्याची जागच्या जागीं कान उघाडणी करीत असत व त्याच्या जन्मभर लक्षांत राहील असा धडा त्याला शिकवीत असत. निंदक कोण, कोणी कुणाची कुठेंही निंदा केलेली असो; किंवा प्रत्यक्ष बाबांचा उपहास केलेला असो त्याची खबर बाबांना तात्काळ लागत असे. आम्हींही ही गोष्ट सदैव ध्यानीं ठेविली पाहिजे.

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] डिसेंबर १९६३ [ अंक ९ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साइ निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

देव भावाचा भुकेला. देवाला तुमची भक्ति पाहिजे. दुसरें कांहीं नको. तुम्हीं मोठाले ग्रंथ कितीहि वाचा. तोंडपाठ करा. वादविवाद घाला. चर्चेचा घोळ घाला. जोंवर तुमच्या ठायीं भक्तिभाव जागा झाला नाहीं, तोंवर सारें निरर्थक मनाला शाश्वत शांति मिळाली पाहिजे. ती शांतता पांडित्यानें किंवा पदरीं कितीहि विद्वत्ता असली तरी मिळूं शकत नाहीं. येथें पुस्तकी ज्ञान उपयोगी पडूं शकत नाहीं. तर्कवितर्क मदतीला येऊं शकत नाहीत. मग काय पाहिजे? अंतःकरणाचा ओलावा. अंतःकरणाची निर्मलता, सोज्वळता ती भक्तिभावानें साध्य होते.

अनंतराव या नांवाचे एक गृहस्थ मनाच्या शांततेसाठीं फार धडपडत होते. जंग जंग पछाडीत होते. मोठमोठाले ग्रंथ वाचीत होते. पाठांतर करीत होते. शास्त्रांचें व पुराणांचें पारायण करीत होते. परंतु त्यामुळें मनाला जरूर असलेली शांतता न मिळतां ते अधिकाधिक गोत्यांत सांपडत होते. विचार चक्रांत गर गर फिरत होते. त्या भ्रमंतीतून त्यांची कांहीं सुटका होत नव्हती.

शेवटीं त्यांना साईबाबाकडे जाण्याची प्रेरणा झाली. बाबांचें दर्शन घेऊन त्यांना त्यांनीं आपली रडकथा सांगितली.

बाबानीं त्यांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें व त्याला एक दृष्टांत सांगून त्याला मार्गस्थ केला. बाबांच्या बोलण्यांत व वागण्यांत खोल अर्थ भरलेला असे. तो चटकन् सर्वांच्याच लक्षांत येत नसे. तो अर्थ कोणातरी जाणत्याकडून समजून घ्यावा लागत असे.

त्याप्रमाणें अनंतरावांनीं तो अर्थ समजावून घेतला. तोच येथें सांगावयाचा आहे. प्रत्येक माणसाची धडपड शांततेसाठीं चाललेली असते. परंतु ती शांतता मात्र त्याच्यापासून दूर दूर पळत असते. याचें कारण तेथें भक्तीला थारा मिळालेला नसतो. देव भावाचा भुकेला. जेथें भक्तिभावाला थारा नाहीं तेथें देव स्थिरावेल कसा? "जपतप योग साधन! वेदोपनिषद–परिशीलन! उदंडअध्यात्म ज्ञाननिरूपण। भक्तिविहीन तें फोल!!

हे बाबांचे बोल आहेत. कितीही वाचन करा; पाठांतर करा. त्याला भक्तिभावाची जोड नसली तर त्याचा कांहीं एक उपयोग नाहीं.

नऊ प्रकारची भक्ति सांगितली आहे. श्रवण, कीर्तन, विष्णुस्मरण, चरणसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन हे ईशप्राप्तीचे नऊ मार्ग सांगितले आहेत. यापैकीं आपणांस परवडेल तो मार्ग पत्करावा व त्या मार्गावर निष्ठा ठेवून तो आचर

णांत आणावा. या सर्वांत नामस्मरण अत्यंत सुलभ आहे. त्या मार्गानें भक्तिभावपूर्वक गेल्यानें देव पावतो. मग वेदाध्ययन नको, शास्त्रें पढायला नकोत, कांहीं नको. मनाला स्थिरता यायला नामस्मरणासारखें साधन नाहीं. त्याची कांस प्रत्येकानें धरावी.

अनंतरावास याचा बरोबर उमज पडला व त्यांनीं त्या मार्गाची कांस धरून बाबांच्या आशीर्वादानें स्वतःचा उद्धार करून घेतला.

मनांत पापी विचार येऊं नयेत, मनांत भलती सलती खळबळ उडूं नये व मन शांत व्हावें असें प्रत्येकाला वाटतें; परंतु काय करावें हें मात्र सुचत नाहीं व उमजत नाहीं. नामस्मरण, देवभक्ति हाच त्यावर रामबाण उपाय आहे.

जोपर्यंत तुम्हीं एकाग्रतेनें व भावपूर्वक भक्ति मार्गाकडे वळलां नाहीं तोंपर्यंत तुम्हीं खऱ्या शांति सुखापासून दूर दूरच रहाल. सर्वांठायीं सद्भाव असावा. आपपर भावाला तिलांजलि देण्यांत यावी. सर्वांठायीं समभाव. आपणाला सर्वांच्या कल्याणासाठीं झटायचें आहे. प्रत्येकानें हा विचार मनांत आणून त्याप्रमाणें वागण्याचें ठरविलें व तो ठराव प्रत्यक्ष अंमलांत आणिला तर त्यामुळें केवळ एकट्याचेंच नव्हे तर समाजाचें व देशाचेंही कल्याण साधल्याशिवाय रहाणार नाहीं.

—संपादक

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**




## बाबा नवसाला पावतात

**श्री. वि. स. कुळकर्णी, सब इंजिनियर बॅंबे वॉटर वर्कस् कार्टर्स, जे. जे. हॉस्पिटल समोर, १२५ बाबुला टॅंक रोड, मुंबई हे आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात :—**

माझा हा अनुभव १९५९ सालातील आहे. त्यावेळीं मी घाटकोपर येथें रहात असें. श्रीसाईबाबांच्या भक्तांपैकीं मी एक आहे. माझे एक थोरले बंधू यवतमाळ येथें इंजिनियर म्हणून नोकरीस होते. त्यांची नोकरी अचानकपणें सुटली त्यामुळें त्यांच्यावर फारच बिकट प्रसंग गुदरला. अनेक ठिकाणीं खटपट करूनसुद्धां त्यांना नोकरी मिळणें कठीण झालें. त्यांची ज्या ज्या गांवी व ज्यांची ज्यांची म्हणून ओळख होती; त्या त्या गांवी ते स्वतः जाऊन आले परंतु नोकरी मिळण्याची चिन्हें दिसेनात, त्यामुळें ते अतिशय नाराज झाले.

त्यांचे कुटुंब सुद्धां मोठें होतें. ५ मुली व २ मुलगे व ते नवरा बायको मिळून एकंदर ९ माणसें घरांत. आजकालच्या महागाईच्या काळांत कसें भागवणार याजवर दस्त चिंतेंत ते होते. ते माझेकडे जेव्हां आले तेव्हां त्यांनीं वरील चिंता व्यक्त केली. मीहि घाबरलों, कारण प्रसंग कठीण होता. माझे कुटुंबांत सुद्धां ५ माणसें होती. त्यामुळें त्यांना मी किती दिवस मदत करणार? थोडी मदत केली परंतु कायम स्वरूपांची मदत करतां येणें शक्य नव्हतें व म्हणून नोकरी लवकरांत लवकर मिळणें अत्यंत आवश्यक होतें.

मी बाबांचा भक्त असल्यामुळें माझा पूर्ण विश्वास बाबांवर व त्यांना पण मी तसें सांगितलें कीं आपण बाबांना शरण जा व त्यांना अंतःकरणपूर्वक प्रार्थना करा कीं, ‘ बाबा, मला जर नोकरी मिळाली तर मी शिर्डीस येऊन सत्यनारायण करीन. ’

त्यांना एक बाबांचा फोटो दिला व श्रीसाईलीलामृत ही पोथी देऊन वाचण्यास सांगितलें. तसेंच बाबांची रोज पूजा करण्यास सांगितलें.

ही सर्व व्यवस्था करून ते आपले घरीं गेले.

त्यांचे पोहोंचल्याचें पत्र आलें. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं आपण सांगितल्या-प्रमाणें मी बाबांची पोथी रोज वाचतों व पूजा पण करतों. त्याशिवाय आपण सांगि-

तत्याप्रमाणें नवस पण केला आहे. परंतु आपण बाबांची भक्ति फार वर्षांपासून करतां तेव्हां माझ्यापेक्षां बाबा आपलेच जास्त ऐकतील, तेव्हां आपण सुद्धां बाबांना माझ्यातर्फे गळ घालावी म्हणजे काम लवकर होईल. हें पत्र मला साधारणपणें मंगळवारीं मिळावें. मी दर गुरुवारीं सायंकाळीं बाबांची पूजा आरती, ऊद जाळणें, पोथी वगैरे करीत असतों. त्याप्रमाणें लगेच येणाऱ्या गुरुवारीं आरती पूजा वगैरे आटोपल्यावर ध्यान धरून बाबांना मी त्यांचेतर्फे विनंती केली कीं, “बाबा, माझ्या भावावर प्रसंग मोठा कठीण गुदरला आहे हें आपण जाणतच आहांत. कारण आपण सर्व ज्ञानी आहांत ह्या प्रसंगांतून माझ्या भावाची मुक्तता करण्यास आपणाशिवाय दुसरे कोणीच समर्थ नाहीं. माझ्या मदतीवर ते किती दिवस अवलंबून रहाणार व मी तरी कितीं दिवस मदत करणार? तेव्हां केवळ माझ्याकरितां आपण त्यांची कोठेंतरी सोय लावावी म्हणजे त्याना शक्य तितक्या लवकर नोकरी लावून द्यावी ही माझी कळकळीची विनंती आहे.’

अशा प्रकारें प्रार्थना केली व त्याप्रमाणें भावाला पत्र लिहून कळविलें व नोकरी नक्की लागणार भ्रांत शंका नाहीं. व मिळाल्याबरोबर मला कळवावें असें लिहिलें.

आणि आश्चर्याची गोष्ट ही की आठ दिवसांनीं भावाचें पत्र आलें कीं मला नोकरी लागली आहे. व दोन तीन दिवसांत मी काटोळ येथे कामावर रूजू होत आहे. नंतर त्यांनीं शिर्डीस येऊन नवस केल्याप्रमाणें श्रीसाई सत्यनारायणाची पूजा केली वगैरे वगैरे. तात्पर्य हें कीं बाबा भक्तांच्या हांकेला नेहमीच ‘ओ’ देतात व त्यांना संकटकाळी मदत करतात. फक्त भक्ति मनापासून पाहिजे.

× × ×

## ‘ माझीं हाडें तुंबरींतून बोलतील ! ’

**श्री. प्रभाकर, श्री. जठार, आर. के. बिल्डींग नं. २ गोखले रोड ( नॉर्थ ) दादर, मुंबई २८ हे लिहितात कीं,**

मुंबईपासून सहाशें मैलांवर कांडला. म्हणून एक बंदर आहे. जगांतील मोठमोठ्या तेलवाहु बोटी ह्या बंदराला लागतात व पेट्रोल ऑईल भारतास पुरवितात. ह्यांच बंदरांत माझी फायर-ऑफिसर म्हणून नेमणूक झाली. मी १९४० पासून मुंबई बंदरखान्यांत काम करीत होतो व १९४४ साला सारखें गोदींतील स्फोटही पाहिलें होते; पण त्या मानानें कांडला बंदराची तऱ्हा कांहीं और होती. ती ता. १८।९।५५ रोजीं रात्रीपासून “हॉंगकॉंग पेट्रोलवाहु बोट बंदरांत पेट्रोलचा पुरवठा करीत होती. रात्रीं २ वाजल्यापासून अगदीं उदासवाणें वातावरण बंदरांत पसरलें होतें. जणुं कांहीं मृत्यू आपलें जाळें बंदरांत पसरून “धीवरा”सारखें आम्हांला खेंचावयास बघत होते, माझ्या हाताखालील सर्व अधिकारी डोळ्यांत तेल घालून पहारा देत होते. पण मला स्वतःला अजीबात झोंप लागत नव्हती व प्रत्येक क्षणाला परिस्थिती अधिकच गंभीर होत जात होती. मी पूर्ण युनिफॉर्म करून स्वतः जातीनें हालचाल करीत होतों. आतां पहांट होत आली होती व पूर्वेकडून सूर्याचें बिंब सागरातून वर येत होतें.

माझ्या हातांत चहाचा कप होता तो मी तोंडाला लावला. इतक्यांत कुत्रा शेंड काढून रडावयास लागला. माझ्या काळजांत चर्र झालें व मी आजुबाजूला पाहूं लागलों, तों काय! आगीचा लोट हजार फूट पूर्वेकडे आकाशांत जातांना दिसला. पेट्रोलवाही हॉंगकॉंग बोटीला आग लागली होती. तसाच मी बोटीवर धावलों. १९४४ साल! गोदीस्फोटाची आठवण झाली. हजारो माणसांचें मरण व बंदरांचा विनाश डोळ्यापुढें दिसूं लागला. आगीनें रुद्ररूप धारण केलें होतें. बोट शेवटच्या सिग्नलचा भोंगा वाजवीत होती. " जीव घेऊन पळा " कठीण समय येतां कोण कामास येतो! ही संतांची आठवण झाली. मृत्यूला मिठी मारण्यापूर्वी श्री साईबाबांची प्रार्थना केली " बाबा, आग विझवा." कुठून तरी आवाज आला " आग अकरा वाजतां विझेल." मानवी प्रयत्नांची शिकस्त झाली. आगीच्या उष्णतेनें जर बोट फुटली तर फुटेल व प्रत्येक नट बोल्ट गोळीसारखा मारा करील म्हणून सात मैलाचा टापू खालीं करण्यांत आला. समुद्राला ओहटी चालू झाली. पाणी आगीला कमी मिळूं लागलें; आग तर वाढत चालली. अग्नीनारायण शांत होईना. चीफ फायर ऑफिसरनें डोक्यावरील हेलमेट व कंबरेची कुऱ्हाड अग्नीला समर्पण केली. आगीची उष्णता येवढी होती की जवळ गेल्यास अंगाची कातडी होरपळून जाऊं लागे. बोटीचा पत्रा येवढा तापला होता कीं खाऱ्या पाण्याचें लगेच मीठ होत होतें. घड्याळयाचा काटा पुढें पुढें सरकत होता. आग कमी जास्त होत होती. इतक्यांत आमच्यांतील एक दाढीवाला सीमेंटचा खालीं गोण घेऊन " हरहर महादेव " करीत आगींत घुसला व हातानें गोण आगीवर मारूं लागला. आग विझविणारे सर्व लोक चेव येऊन बोटीवर घुसले आणि काय आश्चर्य ज्वाला हळूंहळूं शांत झाल्या. घड्याळांत बरोबर ११ वाजले होते. मीं त्या दाढीवाल्याकडे गेलों व त्याला विचारलें ' हें कसें काय झालें? ' तेव्हां तो म्हणाला, ' माझ्या कानांत कोणीतरी तिनदा सांगितलें—तूं गोणत्यानें आग विझव. मला साईबाबांची आठवण झाली व मशीदमाईत लाकडानी पेट घेतलेल्या गोष्टीची आठवण झाली. बाबांची तऱ्हा और आहे. आमच्या कांडल्याच्या वंखान्यांत दर गुरुवारीं हंडीभोजन व बाबांची आरती नेहमीं पूर्वीपासून होत असे; नाहींतर ही सत्य गोष्ट लिहावयास आज जगलों नसतों; कारण पेट्रोलची पेटलेली बोट मनुष्यहानी न होतां पूर्ण वाचणें म्हणजे जगांतील एक मोठें आश्चर्य आहे!

× × ×

## संकट दूर करणारे बाबा!

**श्री. चिंतामणी कृष्णाजी सोहोनी; ४२९, नारायण पेठ, पुणें २ हे साईबाबासंबंधी आपणास आलेला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात—**

माझ्या मानलेल्या एका गरीब बहिणीच्या जीवनांत श्रीसाईबाबांनीं घडवून आणलेली एक नवल कथा पुढीलप्रमाणें आहे.—

सहा वर्षांपूर्वीची गोष्ट. सन १९५७ च्या सुमारास मार्च महिन्यांत आमची

सौ. आई व आजी दोघीहीं आजारी होत्या आणि थोर माणूस म्हणून माझे वडील व थोरले बंधू अशी दोघे उद्योगांत असल्यानें, धाकट्या दोघी भगिनी एक अपंग व अंध झाल्यामुळें घरकामास अगर स्वयंपाकास फारच अडचण झाली आणि काळजीही मागें हात धुवून लागलेली. अशा परिस्थितींत 'श्रीसाईनाथा' शिवाय कोणाचेंच आमचें-कडे लक्ष नव्हतें. आम्हीं त्यांचीच करुणा भाकीत होतों. त्या माऊलीला दया आली. आणि सकाळी चतुर्थीच्या दिवशीं आमचेकडे मी जिचा उल्लेख करीत आहे, तीं आमची बहीण आमचेकडे आली. 'साधारण वय २६।२७ दुर्दैवानें नशीबावर घाला घातल्यामुळें व सासरचा जाच असह्य झाल्यानें तिनें दहा वर्षांपूर्वीं घर सोडलें. पुण्यास एका मोठ्या संस्थेनें (सेवासदन संस्था) तिला आधार दिला. कष्ट करून, अभ्यास करून व्ह. फा. पर्यंत शिक्षण पुरें केलें व ती चांगल्या तऱ्हेनें पास झाली. पण हल्लीच्या काळांत एवढ्याशा शिक्षणास कोण विचारतो? पण हिंमत खचूं न देतां तिनें स्वयंपाकादि कामें करून एस. एस. सीपर्यंत शिक्षण पुरें केले; तशांत एका वृद्ध महिलेची आणि तिची गाठ पडली आणि चमत्कार पहा त्याच वेळेस आमच्याकडे वरील मितीस ती आली.

नांव उषा वासुदेव आपटे. तिनें सर्व परिस्थिती निवेदन केली. आम्ही त्याच अडचणींत होतों. श्री. बाबांनीं ती दूर केली. परंतु ती तरुण असल्यानें कांही लोकांना तें पहावत नसे. आमची मनें पवित्र असल्यानें आम्हीं कोणास भीक घालीत नव्हतों. त्याच दिवशीं आमच्या पिताजींनीं त्यांना सांगितलें, तुम्ही येथें आला आहांत. परंतु आमची स्वैंपाकीण अथवा मोलकरीण म्हणून आला नाहींत. जशी माझी दोन मुलें व दोन मुली तशा तुम्ही. थोडासुद्धां संकोच न करतां हें आपलेंच, स्वतःचें घर आहे असें माना.'

आमच्या घरांत नेहमीं धार्मिक कृत्यें चालत असून, माझी आई, वडील व मी स्वतः श्री बाबांचा भक्त आहे. श्री बाबांची पुजा, आरती व देव देवताची पुजा योग्य प्रमाणांत व्यवसाय सांभाळून करीत असतों. श्री बाबांच्या कृपेनें सर्व कांहीं ठीक आहे. माझी आई तर फारच भाविक आहे. त्यामुळें आमच्यावरच काय पण आमच्याकडे येणाऱ्या कोणत्याही व्यक्तिशींसुद्धां आमची आई प्रेमानें व आदरानें वागते. आम्हांला श्री बाबांचे अनेक अनुभव आले असून हल्लीहि येतात. ती पुण्यांतील महिला भजनी मंडळांपैकीं एका मंडळाची सभासद आहे. तिचे ओळखीनें बालमित्र श्री साईनाथ भजनी मंडळाचा कार्यक्रम दरवर्षी होतो. वरील प्रसंग जो घडला तो मंडळाच्या भजनानेच असें माझे ठाम मत आहे.

आमच्या भावाचा लग्नाचा योग आला आणि श्रीबाबांच्या कृपेनें तें जमलें व पारहि पडलें. दि. ८–६–६३ त्या शुभप्रसंगीं मला माझ्याकडे असलेल्या मोठ्या बहिणीची उणीव भासली. उषाताई आम्हांला परकी वाटेनाशी झाली. तीच आमची मोठी बहीण हें मनांत, हृदयांत पक्कें ठसून गेलें. परन्तु तिनें ह्या मंगल प्रसंगीं येण्याचें टाळलें. आम्हां सर्वांनाच अत्यंत दुःख झालें. ती आमच्याकडे त्या वेळेस एक आठ-

वडा आली नाहीं. ती येत नाहीं असें पाहून आमचेकडे दरवर्षी श्रीबाबांचे भजन करणारे श्री. हनुमानसिंह ठाकोर ऊर्फ दादा यांस विनंती केली कीं, हें कार्य कसें होणार आमच्या मदतीस कोणी नाहीं. आणि उषाताईहि येत नाहीं. लग्न तर १० दिवसांवर आलें. ते म्हणाले, 'श्रीबाबांना सर्व काळजी आहे तोच पार पाडणार. आपली मात्र पूर्ण श्रद्धा पाहिजे.' योगायोग असा कीं, दि. ३-६-६३ रोजीं इनामगांव (विदर्भ) बाजूचे तेथील एक विधूर गृहस्थ श्री. पांडुरंग मं. काळे विकास अधिकारी पंचायत हें त्यांचे कांहीं कामानिमित्त पुण्यास आले होते, तसे ते नेहमी येतात असें कळलें. परंतु श्रीबाबांच्या लीलेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच. त्यांची व उषाताईची भेट होऊन त्यांनीं सत्य परिस्थिती निवेदन केली व लग्न करण्याची इच्छा दर्शविली. त्यांना दोन मुलें असून नुकतीच त्यांची व त्यांच्या कुटुंबाची ताटातूट झाली. त्याच वेळेस उषाताई घरीं आली, श्रीबाबा, आई, वडील यांना नमस्कार करून सर्व हकीकत सांगितली आणि आज्ञा मागितली. या सर्व गोष्टींमुळें आम्हां सर्वांनें हृदय भरून आलें आणि डोळे पाणावले बाबा काय तुमची करामत? आमच्या उषाताईचें वैधव्य घालवून सबंध आयुष्याचे कल्याण करण्याचा योग आणलांत. काय तुमची माया!" दोन दिवसांवर बंधूंचे लग्न आले. लग्नांत उषाताईची उणीव भरून निघाली. आधी आप्पाचे लग्न नंतर माझे असें सांगून दि. ९।६।६३ रोजीं वैदिक पद्धतीनें तिचा विवाह झाला. दोघानीं बंधूंच्या लग्नास आलेल्या वऱ्हाडी मंडळींना नमस्कार केला. व मला म्हणाली, 'भाऊ तुला वहिनी आणली आतां मी मोकळी झालें." दोन दिवस मुक्काम आमचे घरींच होता. जाते वेळेस सर्वांच्या नेत्रांतून दुःखाच्या गंगा जमुना वाहूं लागल्या. मी पण त्यांत सामिल झालों. आई वडिलांनीं उभयतास पूर्ण आशीर्वाद दिला. आतां तिचे नांव सौ. प्रमिला आहे. परवां दिवळीस माहेरपणासाठीं पंधरा दिवस आली होती. घरचे फारच छान आहे. चार दिर, सासू, सासरा, एक नणंद असून सर्व एकत्र कुटुंब पद्धतीनें रहातात. नोकरी निमीत्तानें वेगळे असले तरी वर्षांतून चार वेळां एकत्र येतात. असे तिनें सांगितलें. मी तिला म्हणालों तूं श्री साईबाबांना विसरूं नकोस त्यांचे तुझ्यावर अनंत उपकार आहेत. ते कृपावंत आहेत. आपला भक्त संकटांत सांपडला असतांना ते कोणाच्याही रूपानें जाऊन त्यांतून त्याला बाहेर काढतात. अशी आहे माझी साई माऊली. मलाच काय पण घरांतील सर्व भावंडास मातृभक्तीनेंच श्री साईबाबांचे वेड लागलें. सौ. प्रमीलाबाई (उषाताईस) तर श्री बाबांखेरीज दुसरी उपासनाच नाहीं. म्हणून म्हणतों—

साई साई नित्य म्हणाल ॥<br>
सात समुद्र करील न्याहाल ॥<br>
या बोला विश्वास ठेवाल ॥<br>
पावाल कल्याण निश्चयें ॥

# भक्तांबरोबर बाबा कसे वागत ?

**बाबा आपल्या भक्तांशीं कसें वागत, कसे विनोदानें बोलून त्यांचें हंसत खेळत मार्गदर्शन करीत असत हें प्रत्येकानें लक्षांत घेण्यासारखें आहे. प्रत्येकानें आपल्या गुरुवर व उपास्य दैवता-वर संपूर्ण श्रद्धा ठेवावी असें त्यांचें नेहमीं सांगणें असे.**

शिरडीला रविवारचा बाजार भरतो. लांबलांबच्या खेड्यांतून खेडूत या बाजाराला येतात आणि आठवड्याच्या वस्तु खरेदी करतात. अशाच एका बाजाराच्या दिवशीं सर्व भक्तमंडळी बाबांसमोर बसली असतां अण्णासाहेब दाभोलकरांच्या हाताच्या बाहींतून भाजलेले चणे बाहेर पडले. अण्णा बाजारांत गेले नव्हते व त्यांनीं चणेहि विकत घेतले नव्हते. एकदम चणे कुठून आले या गोष्टीचें सर्वांना नवल वाटलें. बाबा मुद्दामच विनोदानें म्हणाले, ' हा अण्णा फार लबाड आहे. एकटाच बाजारांत जाऊन चणे खात बसतो. मला त्यांची संवय ठाऊक आहे. नाहींतर त्यांच्याजवळ चणे कुठून आले ? " बाबांच्या विनोदाचें अण्णांना कौतुक वाटून ते म्हणाले, " बाबा मी सकाळ-पासून कुठेंहि बाहेर गेलों नाहीं. शिरडीचा बाजार तर मीं अजून पाहिलाही नाहीं. शिवाय कोणतीही वस्तु अशी गुपचुप घेऊन एकट्यानेंच खाण्याची मला संवय नाहीं मग माझ्यावर हा वृथा आळ कां ? " या प्रश्नावर बाबांनीं त्वरित उत्तर दिलें, " तूं दुसऱ्यांना देतोस हें मला ठाऊक आहे; पण तुझ्यांजवळ कुणी नसल्यास तूं काय करतोस ? कोणतीही जिन्नस खाण्यापुर्वी माझी आठवण करतोस काय ? मी नेहमीं भक्तांच्या सन्निध असतों. मला नैवेद्य दाखवितोस काय ? "

बाबांच्या या चण्याच्या लीलेंत फार खोल अर्थ भरलेला आपल्याला दिसून येईल. त्या ठिकाणीं चणे उत्पन्न करून बाबांनीं भक्तांना एक लहानसा धडा शिकविला. शारीरिक व मानसिक कोणत्याही सुखाचा उपभोग घेतांना भक्ताचें मन इतकें विरक्त झालें पाहिजे कीं, प्रत्येक क्षणाला त्याला आपल्या गुरूचें स्मरण झालें पाहिजे. देवाला नैवेद्य दाखवितांना आपण त्या वस्तूचा मोह आणि अभिलाष सोडून तीवर पाणी सोडतों आणि प्रथम गुरुचरणीं ती वस्तु अर्पण करून मग स्वतः ग्रहण करितों. ही त्यागाची कल्पना, ' तेन त्यक्तेन भुञ्जीथः ' हें श्रुतिवचन, भक्तांच्या मनांत रुजविण्या-करितांच बाबांनीं ही चण्याची लीला करून दाखविली.

## बाबांचा विनोद

भक्तमंडळींच्या दैनंदिन कार्यक्रमांत रूक्षपणा येऊं नये म्हणून बाबा सात्विक विनोदाचा मधून मधून अवलंब करून हास्य निर्माण करीत आणि भक्तांची अंतःकरणें

प्रफुल्ल ठेवण्याचा प्रयत्न करीत. अण्णा चिंचणीकर हे साठी उलटलेले वयोवृद्ध गृहस्थ शिरडी संस्थानचा जमाखर्चाचा व्यवहार फार दक्षतेनें पहात असत. त्यांचा स्वभाव फार शिस्त आणि सरळमार्गी होता. ते कोणाचीहि पर्वा करीत नसत. बाबांचा त्यांच्यावर फार लोभ होता. आपली सर्व धनदौलत बाबांच्या चरणीं अर्पण करून त्यांनी महान् त्याग केला होता. दुपारच्या प्रहरीं बाबांच्या विश्रांतीच्या वेळीं अण्णा बाबांच्या बाजूला बसून त्यांचा डावा पाय रगडीत बसले असतांना वेणूबाई नांवाच्या एक वृद्ध मावशीबाई तेथें आल्या आणि बाबांच्या उजव्या बाजूनें त्यांची पाठ रगडीत असल्या. मावशीबाई इतक्या जोरानें पाठ रगडूं लागल्या कीं, बाबांचें पाटपोट एक होऊं लागलें व त्यांना जोरजोरानें धक्के बसूं लागले. अण्णा शांतपणें आपलें काम करीत होते. मावशीबाईंच्या गालाला अण्णांच्या डोक्याच्या या धांदलींत स्पर्श होतांच ती वृद्ध बाई सहज मस्करीनें म्हणाली, "हा अण्णा फार चावट आहे. माझ्या गालाचें चुंबन घेण्याचा प्रयत्न करितो. इतका म्हातारा थेरडा झाला तरी त्याला लाज कशी वाटत नाहीं?" मावशीबाईचे हे शब्द ऐकून अण्णांची तळपायाची आग मस्तकाला गेली. रागानें लालबुंद होऊन आपल्या अस्तन्या वर सारीत ते मोठ्यानें ओरडले, "मला थेरडा म्हणतेस! मला कांहीं अकल आहे कीं नाहीं? उगाच खोडी काढून माझें डोकें भडकवूं नकोस."

आकस्मिक निर्माण झालेलें हें पेल्यांतील वादळ पाहून तेथें जमलेल्या मंडळींत एकच हंशा पिकला. सर्वजण पोटभर हंसले. बाबांचें दोघांही भक्तांवर निर्मळ प्रेम असल्यामुळें दोघांचें समाधान अत्यंत कुशलतेनें करण्याच्या उद्देशानें फार मार्मिकपणें बाबा म्हणाले, "अरे अण्णा, विनाकारण पराचा कावळा कशाला करतोस! आपल्या आईचें मुलांनीं वात्सल्यभावनेनें चुंबन घेतलें तर काय बिघडलें आणि त्यांत गैर काय आहे?" बाबांच्या प्रासंगिक समयसूचक अशा या विनोदानें सर्व द्वारकामाई आनंदाश्रूंनीं खदखदून निघाली.

### भक्ताच्या इच्छेला मान

बाबा भक्तांना त्यांच्या इच्छेप्रमाणें वागूं देत असत. त्यांच्या मार्गांत कोणीही विघ्न आणलेलें त्यांना सहन होत नसे. याच मावशीबाई एकदां जोरजोरानें बाबांचें पोट चोळीत होत्या. त्यांची ती हास्यास्पद कृति पाहून एका भक्ताला वाईट वाटलें व त्यानें मावशीबाईंना हळू पोट दाबण्याचा सल्ला दिला. बाबांना एकदम राग आला. त्यांचे डोळे लालबुंद झाले. आपल्या जवळच्या लांकडाचा तीन फूट लांबीचा सोटा त्यांनी जोरानें आण आपल्या पोटांत खुपसला. समोरच्या खांबाचा आश्रय घेऊन बाबा तो सोटा पोटांत आंत खुपसूं लागले. आतां बाबांचें पोट फुटतें कीं काय अशा भीतीनें सर्व भक्त हवालदील झाले. बाबा रागानें सारखे पुढें सरकत होते. त्यांचें पोट खांबाला भिडलें व सर्व सोटा आंत खुपसला गेला. थोड्या वेळानें बाबांचा राग शांत झाला व त्यांनीं तो सोटा बाहेर फेंकून दिला. त्या प्रसंगापासून कुणाही भक्तानें बाबांच्या वाटेस

जाण्याचें धाडस केलें नाहीं. भक्ताच्या मनाला येईल त्याप्रमाणें त्यानें सेवा करावी हाच नियम त्या क्षणापासून शिरडीला सुरू झाला.

भक्त वेगवेगळ्या मनोवृत्तीचे असल्यामुळें विचित्र स्वभावांचा अनुभव पाहाण्यास मिळे. पण बाबा त्या सर्वांना किती निरपेक्ष बुद्धीनें उत्तरें देत हें खरोखरच अभ्यास करण्यासारखें आहे. रामनवमीचा उत्सव मोठ्या थडाक्यानें सुरू करणारा आणि जरीची पताका पकडविणारा दामूअण्णा शेठ हा व्यापारी असल्यामुळें त्यानें एकदम लाखों रुपये मिळविण्याचा कापसाचा सट्टा खेळण्याचें मनांत योजिलें व बाबांची परवानगी पत्रानें मागविली. बाबांनीं निःस्पृहपणें बिलकुल भीड न बाळगतां "हा जुगाराचा मार्ग चुकीचा आहे, परमेश्वरानें दिलेल्या अर्ध्या भाकरींत प्रत्येकानें संतुष्ट राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे." असा त्याला उपदेश केला. दामुअण्णा कष्टी झाला, कारण त्याच्या व्यापारी दृष्टीनें जें धोरण आंखलें होतें तें अंगलट येण्याचा बिलकुल संभव नव्हता. उलट झाला तर अगणित फायदा होण्याचा तो उत्तम योग होता. व्यापारांत योग्य ती संधि साधून हात धुवून घ्यावा लागतो. दामुअण्णाचें समाधान झालें नाहीं व प्रत्यक्ष बाबांना भेटून पहावें या इच्छेनें तो शिरडीस आला. बाबांच्यापुढे हा प्रश्न काढण्याचें धारिष्ट्य त्याला झालें नाहीं. मनांत मात्र तोच विचार सारखा घोळत होता. आपल्याला जर या व्यवहारांत फायदा झाला तर कांहीं भाग आपण बाबांना देऊं, असाही विचार त्यांच्या मनांत आला, पण तोंडानें उच्चार मात्र झाला नाहीं. बाबांनी त्यांच्या मनांतले विचार जाणून स्पष्टपणें सर्वांच्या देखत म्हटलें, "बापू, या सांसारिक ऐहिक गोष्टींच्या नादीं लागून स्वतःला गुरफटून ठेवण्याची माझी इच्छा नाहीं."

### भक्तीचें फळ

बाबांची इच्छा नाहीं असें पाहून दामूअण्णांनीं सट्टयाचा नाद सोडून बाबांना "मी धान्याचा व्यापार करूं काय?" म्हणून विचारलें. त्यावर बाबांनीं "रुपयाला पांच शेर या भावानें खरेदी करून सात शेर या भावानें विकावें लागेल," असें चमत्कारिक उत्तर दिलें. अर्थात् या धंद्यांतही तोटा होणार हें बाबांनीं निदर्शनास आणून दिल्यामुळें दामूअण्णानें तोही नाद सोडून दिला आणि तो स्वस्थ बसला. त्याच्या इतर व्यापारी मित्रांनीं धान्याचा सांठा गोळा केला. त्या वर्षी सर्वत्र विपुल पाऊस पडल्यामुळें धान्याचे भाव एकदम घसरले आणि दामूअण्णाच्या व्यापारी मित्रांना भयंकर नुकसान सहन करावें लागलें. दामूअण्णानें योजिलेला भरंवशाचा कापसाचा सट्टा असाच अंगलट आला आणि त्यांत दामूअण्णाचे शेअरबाजारांतील सहकारी व्यापारी ठार बुडाले. बाबांनींच आपल्याला वांचविलें याबद्दल दामूअण्णाची पूर्ण खात्री झाली व पुढें तो बाबांचा एकनिष्ठ भक्त बनला.

पुढें दामूअण्णाला त्याच्या भक्तीचें फळही उत्तम मिळालें. दामूअण्णाची व्यापारांत भरभराट झाली, खूप पैसा मिळाला. त्यानें दोन बायका केल्या परंतु एकी-

काहीं मूल होईना. एकदां गोव्याच्या एका भक्तानें बाबांना तीनशें उत्तमपैकीं आंब्यांची करंडी भेट म्हणून पाठविली. "दाणे दाणे पर लिखा है, खानेवालेका नाम" या म्हणीप्रमाणें बाबांनीं चार आंबे उचलून हे दामूअण्णाकरितां आहेत असें म्हणून बाकीचे सर्व शामाला सर्वांना वांटावयास सांगितलें. संध्याकाळीं दामूअण्णा आकस्मिकपणें बाबांच्या दर्शनास आला. बाबांनीं दामूअण्णाला, "हे आपल्या धाकट्या बायकोला दे आणि तिला खाण्यास सांग, या आम्रफलांच्या सेवनानें तिला चार पुत्र आणि चार मुली होतील," असा आशीर्वाद दिला. ज्योतिष्यांनीं दामूअण्णाला तुझ्या पत्रिकेंत पापी ग्रह बसलेला आहे. तुला एकही पुत्रसंतान होणार नाहीं असें सांगितलें होतें. दामूअण्णानें सांगितल्याप्रमाणें केलें तेव्हां पुढील भविष्यकाळांत त्याला साईंचेच शब्द खरे झाल्याचें प्रत्ययाला आलें, आणि ज्योतिषीबुवांचें भविष्य गडगडलें. श्रीसाईंच्या शब्दांत इतके विलक्षण सामर्थ्य होतें. समाधिकालापूर्वीं थोडे दिवस त्यांनीं आपल्या भक्तांना जवळ बोलावून असेच अधिकारी उद्गार काढले आहेत. बाबा म्हणाले, "हा नश्वर देह सोडून मी आतां जात आहे; परंतु तुम्ही दुःखी होऊं नका. माझ्या समाधींतील हाडें तुम्हांला स्फूर्ति आणि पूर्ण विश्वास देतील. मला शरण आलेल्या भक्तांबरोबर मी समाधींतून संभाषण करीन आणि विचारविनिमय करून त्यांना योग्य तें मार्गदर्शन करीन. मी सतत तुमच्या जवळ आहे. ही भावना मनांत खोल रुतवून वागा म्हणजे तुम्हांला कोणत्याही अंगीकृत कार्यांत अपयश येणार नाहीं."

## गुरुच्या ठायीं श्रद्धा पाहिजे.

साईसारख्या सद्गुरूची पूजा कशी करावी याविषयीं हेमाडपंतांनीं आपल्या ग्रंथांत फार सुंदर विवेचन केलें आहे. पंत म्हणतात, "बाबांची पायपूजा करितांना डोळ्यांतील प्रेमाश्रूंचे थेंब पडूं द्या. पवित्र प्रेमाच्या चंदनानें त्यांच्या कपाळावर टिळा लावा. पवित्र भक्तीची चादर त्यांच्या अंगावर घाला. सात्त्विक विचारांचीं फलपुष्पें त्यांना वहाण्याचा प्रयत्न करा. म्हणजे साई संतुष्ट होतील आणि कुणाही भक्ताला प्रसन्न होतील. साईंच्या पूजेला नवरत्नांची, अत्तरगुलाबदानीची, फळाफुलांची कशाचीही जरूरी नाहीं. साई प्रेमाचे आणि खऱ्या भक्तीचे भुकेले आहेत. मनांत थोडा जरी विकल्प आला तरी घाबरण्याचें अगर संशयग्रस्त होण्याचें कारण नाहीं. साई सांभाळून घेतील व योग्य मार्ग दाखवितील." पंत नांवाचे एक गृहस्थ मित्रांच्या आग्रहावरून शिरडीला गेले. त्यांनीं दुसऱ्या एका अधिकारी व्यक्तीकडून गुरुमंत्र घेतला होता आणि त्या गुरुवरच त्यांची पूर्ण श्रद्धा होती. मोठ्या नाखुषीनें व जबरदस्तीनें ते मित्रांबरोबर शिरडीला गेले. द्वारकामाईत दर्शनाच्या वेळीं तेथील गंभीर देखावा पाहून पंतांच्या मनावर एकदम विपरीत परिणाम झाला आणि ते धाडकन् मूर्छित पडले. साईंच्या उदीनें आणि कमंडलूंतील तीर्थ शिंपडून तेथील मंडळींनीं पंतांना सावध केलें. तेव्हां बाबांनीं त्यांच्या मस्तकावर हात ठेवून सांगितले, "अरे वेड्या, असा घाबरतोस कां ? कोठेंही कोणाच्याही दर्शनाला जा. श्रद्धा मात्र तुझ्याच गुरूच्या

ठिकाणीं ठेव. एकाच व्यक्तीच्या पायांजवळ मन स्थिर कर आणि मनांत त्याच विभूतीबद्दल पूर्ण भक्ति ठेव. जा."

## बाबांचें थोर हृदय

बाबा इतर संतांचा आणि अधिकारी व्यक्तींचा किती मान ठेवीत असत, हें या उदाहरणावरून लक्षांत घेण्यासारखें आहे. नेहमींचा अनुभव असा आहे कीं, दुसऱ्याची निंदा नालस्ती करून स्वतःचा मोठेपणा वाढविण्याची धडपड सर्वत्र चाल असते. पण बाबा इतक्या हलक्या मनाचे नव्हते. त्यांचें मन फार उच्च पातळीवर गौतम-बुद्धांप्रमाणें स्थिर झालें होतें. समकालीन थोर विभूतींना ते नेहमीं मानाची जागा राखून ठेवीत.

मुंबईस बऱ्याच वर्षांनीं वैरागचें भापकर महाराज यांचें आगमन झालें. नानासाहेब पिटकर वगैरे त्यांच्या भक्तमंडळींनीं मोठ्या आग्रहानें दोन दिवस बुवांना ठेऊन घेतलें. बुवा सारखा जाण्याचा आग्रह करीत होते. त्यांना एका ठराविक दिवशीं शिरडीला जाणें भाग होतें; कारण अत्यंत दूर असलेल्या आपल्या मुलाला त्यांनीं पत्रानें तूं अमुक दिवशीं शिरडीला साईबाबांकडे ये, तेथें मी येऊन तुला भेटेन असें कळविलें होतें. मुंबईच्या मंडळींचा आग्रह मोडवेना. बुवांचा नाइलाज झाला व ते गप्प बसले. ठरल्याप्रमाणें त्यांचा मुलगा शिरडीला गेला व कोणाचीच ओळख नसल्यामुळें कोंपऱ्यांत शेवटाला आपल्या वडिलांची वाट पहात स्तब्ध बसला. आरतीला सुरवात होण्यापूर्वी साईबाबांची नजर त्या मुलाकडे गेली आणि आपल्या अंतर्ज्ञानानें हा कुणाचा मुलगा आहे हें ओळखून त्यांनीं त्याला जवळ बोलाविलें व आपल्या भक्तांकडे वळून ते म्हणाले, 'अरे, या मुलाच्या वडिलांची योग्यता फार मोठी आहे. ते स्वतः आज येथें येणार होते, पण भक्तांची इच्छा त्यांना मोडतां आली नाहीं. आतां त्यांचा मान आपणाला राखलाच पाहिजे. आजच्या दरबारांत या गादीवर या मुलाला बसवा आणि त्याची योग्य ती संभावना करा." त्याप्रमाणें त्या दिवशीं भक्तमंडळींनीं त्या मुलाची पूजा—आरती केली. साईचें हृदय किती थोर होते! भापकर बुवांचा अधिकार माहीत असल्यामुळें त्यांना योग्य तो मान त्यांनीं दिला.

## अक्कल कोटचे महाराज

अबकारी खात्यांत बरीच वर्षें काम करून सेवानिवृत्त झालेल्या गोपाळ नारायण अंबाडेकर यांचाही अनुभव या ठिकाणीं उल्लेख करण्यासारखा आहे. ठाणें जिल्ह्यांत व जव्हार संस्थानांत काम केल्यावर त्यांची सांपत्तिक स्थिति फार हलाखीची झाल्यामुळें ते फार कंटाळून गेले व शिरडीला साईच्या चरणांजवळ जाऊन राहिले. १९१६ च्या सुमारास ते आपल्या जिवाला इतके वैतागले कीं, अगदीं अखेरचा आत्महत्येचा मार्ग त्यांनीं स्वीकारला आणि एका रात्रीं मनाचा पूर्ण निश्चय करून शिरडीजवळील एका

विहिरींत जीव देण्याच्या पूर्ण तयारीनें ते निघाले. साई बाह्यतः त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत होते, पण अंतर्यामीं त्यांचें सूक्ष्म लक्ष होतें. गोपाळराव कुणालाही न कळवितां आत्महत्या करण्याकरितां विहिरीजवळ गेले आणि नेमका त्याच सुमारास जवळच्या खाणावळीचा मालक सगुण सहज बाहेर आला आणि गोपाळरावांना पाहून म्हणाला, "अहो गोपाळराव, आपण हें अक्कलकोट महाराजांचें चरित्र जरूर वाचा. फार सुंदर पुस्तक आहे." गोपाळरावांनीं आपला बेत बदलला आणि तें पुस्तक घेऊन घरीं परत आले. पुस्तक वाचतांना सहज एक प्रसंग त्यांच्या वाचण्यांत आला. त्याला योगायोग म्हणतां येणार नाहीं. साईंच्या अद्‌भुत लीलेचाच तो प्रकार असावा. कारण त्या पुस्तकांत महाराजांच्या एका भक्ताचा प्रसंग वर्णन केला होता. तो मनुष्य जिवाला कंटाळून आत्महत्या करण्यास निघाला असतांना महाराज त्याला विहिरींतून बाहेर काढून उपदेश करितात कीं, "तुझ्या मागील जन्मांच्या कृतीप्रमाणें तुला या जन्मांत चांगलें-वाईट प्रसंग भोगणें भाग आहे. आत्महत्येसारखें भयंकर कर्म करून तरणोपाय नाहीं. उलट पुढील जन्मांत तुला यापेक्षां जास्त त्रास सहन करावा लागेल. तेव्हां आपल्या कर्मानें प्राप्त झालेलें दुःख या जन्मांत भोगणें, हें जास्त समंजस आणि शहाणपणाचें होईल. निदान पुढील जन्मांत तरी सुख भोगण्यास मिळेल."

स्वतःच्या परिस्थितीला पूर्ण लागू पडणारा हा प्रसंग वाचून आणि अक्कलकोट स्वामींसारख्या अधिकारी व्यक्तींनीं सांगितलेला उपदेश वाचून गोपाळरावांचें भडकलेलें मन शांत झालें आणि वादळांत हेलकावे खाणारें त्यांचें जीवनतारू सुखरूप पैलतीरावर पोहोंचलें. साईंची ही कृति किती बहुमोलाची आहे! गोपाळरावांचे वडील अक्कलकोट महाराजांचे भक्त होते, साईंनीं सगुणकडून त्याला आपल्या गुरुची आठवण करून दिली आणि त्या सद्‌गुरुची भक्ति करण्यास शिकविलें.

---


## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# नामदेवांची वाणी

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर एम. ए.

: ६ :

## पायो राम रतन धन भाई

हे बंधो ! जे कधींहि मलीन होत नाही अगर गंजून जात नाहीं अशा रामरूपी रत्न-धनाची प्राप्ति करून घे. नामरूपी जहाज, भक्तिरूपी नावाडी यांच्याद्वार मी भवसागर तरून आलों. सद्गुरुकृपा आणि संत-संगती ही मोठ्या भाग्यानें प्राप्त होते. त्या रामनामरूपी धनाला अग्नि जाळूं शकत नाही. त्याला कीड लागत नाहीं किंवा जमीन त्याना पोटांत घेऊं शकत नाहीं. तें धन खाल्ल्यानें अगर खर्च केल्यानें कमी होत नाहीं. सद्गुरुनें अशा धनाची प्राप्ति कशी करून घ्यावी ही कला दाखवून दिली. नामदेव म्हणतात, प्रभु गोपालास सोडून तूं दुसऱ्या कोणाचा शोध घेशील तर तुला परमेश्वराची आण आहे.

: ७ :

## रूडो ठाकुर रडबो

सर्वश्रेष्ठ देवरायाची भक्ति करा. कोणी रूपवान असो, कोणी गुणवान् अगर प्रज्ञावंत असो, ईश्वरभक्ति नसेल तर तो मेल्यासारखा होय. पाणी घुसळण्यानें तूप निघत नाहीं आणि वाळू रगडण्यानें तेल काढतां येत नाहीं. तद्वत् सौंदर्य, गुण व विद्वत्ता या बाह्य साधनांनीं परमात्म्याची प्राप्ति होत नाहीं. जो पुरुष परस्त्रीच्या सहवासांत रंगून जातो तो आगीशिवाय दुर्दशेप्रत जातो. जो नाम-जप करीत नाहीं. त्याला मनःशांति प्राप्त होत नाहीं. मुखानें नुसते वेद-पठण करून काय उपयोग ? नामदेव म्हणतात, ईश्वराच्या ठिकाणीं चित्त अनुरक्त होईल तर तेथें आनंदाचाच निवास आहे त्या सहजावस्थेप्रत जाणारा मार्ग तुम्ही चढून जाल—

: ८ :

## रे मन तेरो कछु नहीं

अरे मना ! तुला आपले म्हणून म्हणतां येईल असे या जगांत कांहीं नाहीं. मग भ्रमानें कां भ्रान्त झालास ? तुझ्या दृष्टींत जे कांहीं पसरले ती सर्व माया आहे. तो परमात्मा एकी एक आहे. त्यांत दुजेपणा अगर भेद नाहीं. हें जाणून व सर्वांमध्यें आपण आहोत हे ओळखून मी आत्मतत्वाला जाणले. प्रत्येक शरीरांत जी वरवर दिसते ती तुझीच शोभा आहे. पाण्यांत ज्याप्रमाणें तरंग त्याप्रमाणें परब्रह्माशीं तूं एकरूप होऊन राहा. हे मानव!

मृग काय किंवा पक्षी काय ही माझीच स्वरूपें होत. येथें विचार केल्यास मीच सेवक आणि मीच माझा गुरु असें कळून येईल. जेथें प्रकाश आणि ध्वनि आहे तेथें माझें वास्तव्य आहे. परमेश्वराचें नाम हे असें स्थान आहे. कीं तेथें विनाश अगर मरण नाहीं. नामदेव म्हणतात, माझी परब्रह्म आहे, मी परब्रह्मांत मिळून गेलो आणि परब्रह्मच होऊन राहिलों आहें. अर्थात आत्मानंदानें मी परिपूर्ण झालो आणि मनांतल्या मनांत हें सर्व समजून चुकलों.

---

# साईचा गर्जा जयजयकार !

[चाल : गर्जा जयजयकार क्रांतिचा]

गर्जा जयजयकार साईचा, गर्जा जयजयकार ॥ ध्रु० ॥

मी तूंपणाची भिंत पाडुनी ।
साई रूप हें भरलें उरुनी ।
काम क्रोध रुपि मगरींना ।
अगस्ति रूपें प्राशी गुरु हा ।
होईल जरी कृपा अपार, गर्जा जयजयकार ॥ १ ॥

श्रद्धा सबूरीची जोड घेऊनी ।
स्मरूं निरंतर साई, साई ।
दुष्कर्मांची होईल होळी ।
सत्संगाची जडतां मेळी ।
बाबासाई राहो पायीं इमान, गर्जा जयजयकार ॥ २ ॥

फकीर, अमीर, उमरावहि या रे ।
गरीब हीन हा भेद नाहीं रे ।
सर्व समोरी तयां लेकरें ।
सकलां उघडें आहे द्वार ।
घालूं साई नामाची ललकार, गर्जा जयजयकार ॥ ३ ॥

प्रेमाचा तूं असती भुकेला ।
जो जें मागे त्या तें देई ।
हीच विनंती पायां पाशीं ।
नाथा तुमच्या चरणीं राहों ।
शांतीचें फूल, गर्जा जयजयकार ॥ ४ ॥

—सौ. शांताबाई अं. सरोदे

# केव्हां तो अभिष्ट पावेल !

(ले. : द. शं. टिपणीस)

स्वातंत्र्य ! लहांनापासून थोरांपर्यंत सर्वांना हा शब्द माहित आहे. स्वातंत्र्य नको कोणास ? सर्वांस पाहिजे. भारत स्वतंत्र झाला आपणांस आनंद झाला. वाटलें, आतां काय वाटेल तें आपण करूं. पण झालें काय ? जुनीं बंधनें गेलीं व नवीं आलीं. सक्तीची बचत, कामाची सक्ति, वेळेचीं बंधनें, १४ कॅरेट, रेशन वगैरे नवीं बंधनें आलीं व आतां म्हणूं लागलों कीं जुना जमानाच बरा होता. घरांतील वडीलधारा माणूस म्हणजे आपल्या स्वातंत्र्यांतील मोठी धोंड असें आजच्या तरुण पिढीला वाटतें. एक दिवस येतो ही धोंड जाते. आनंद होतो. सुटलों एकदाचे. आतां आपण पूर्ण मोकळे. राजाराणी. पण तिसऱ्या जीवाचा प्रवेश होतो. मागोमाग आजारीपण हळूंच घुसतें. जबाबदाऱ्या वाढतात. व पुन्हां बंधनें येऊन पडतात. व्यक्तीच्या काय, समाजाच्या काय, राष्ट्राच्या काय किंवा जगाच्या काय, सर्व व्यवहारांत हेंच दिसून येतें. भारत स्वतंत्र झाला म्हणून कांहीं तो मन मानेल तें करूं शकत नाहीं. जागतिक बंधनें व लोकशाहीची तंत्रें सांभाळूनच त्याला ध्येयाकडे वाट चाल केली पाहिजे. बंधन विरहीत व्यक्ति वा समाज अगर राष्ट्र पूर्वी जगूं शकलें नाहीं व आजच्या गुंतागुंतीच्या परिस्थितींत तर तें मुळींच शक्य नाहीं. निर्मेळ स्वातंत्र्य हें सशाच्या शिंगासारखें आहे. बंधनाच्या फोडणी खेरीज त्याला चव येत नाहीं. बंधनाच्या पलीकडे मुक्तांनीं जावें. इतरांनीं तसे करणें नाशास कारणीभूत होईल. व्यक्तिला स्वातंत्र्य पाहिजे; पण मुक्त स्वातंत्र्य नको. काव्याला मुक्त छंद शोभला तरी जीवनाला तो घातक आहे. शिस्तीची, नितीची, कायद्याची, धर्माची व मानवतेचीं बंधनें व्यक्ति, समाज वा राष्ट्र यांनीं पाळलीं पाहिजेत. बेछूट वागणूक हानिकारक ठरते. बंधनाच्या पलीकडे जाण्यासाठीं प्रथम बंधनें पाळलीं पाहिजेत. मनांत येईल तेव्हां मनांत येईल तें प्रत्येकजण करूं लागला तर समाज व राष्ट्र रसातळाला जाईल. मन हें उच्छृंखल आहे. उच्छृंखल पणांत नाश आहे. पाण्याचा लोंढा नी सोसाट्याचा वारा दुसरें काय करणार ?

### व्यक्ति विकासावर भर

यामुळें आमच्या धर्मानें संयमाचे कोट उभारले आहेत. त्यायोगें समाज वा राष्ट्राला स्थैर्य येऊन प्रगतीचा मार्ग खुला होतो. ज्या समाजांत संयमी लोकांचा भरणा अधिक तो समाज उच्च पातळीवर जाऊं शकतो. व्यक्तीचा समाज व समाजाचें राष्ट्र होत असल्यामुळें जें नियम जी बंधनें व्यक्तीच्या विकासाला जरूर असतात, तेच नियम, तींच बंधनें समाजाच्या वा राष्ट्राच्या विकासालाही जरूर असतात. यामुळें आमच्या धर्माचा विशेष रोख व्यक्ति विकासावर आहे. यास्तव धर्म हा समाज व राष्ट्रविरोधी आहे असें समजणें योग्य होणार नाहीं. व्यक्तीच्या विकासांत समाजाच्या, राष्ट्राच्या विकासाचें बीज असतें. यामुळें आमच्या साधुसंतांचें लक्ष व्यक्तीकडे विशेष असे. साईबाबांच्या उपदेशांत समाज व राष्ट्रानें काय करावें याचा चुकूनही उल्लेख सापडावयाचा नाहीं. व्यक्तीनें काय केलें पाहिजेत व कसें वागलें पाहिजे या संबंधींच त्यांचा उपदेश आहे. व्यक्ति व मानवता यावरच त्यांची दृष्टी खिळलेली आहे. कोणाही व्यक्तिचा बेछूटपणा त्यांना पसंत नाहीं. भलत्याच स्वातंत्र्याचा त्यांनीं निषेध केला आहे. स्वातंत्र्याला मुरड पडली तरी हरकत नाहीं, पण माणसाची वागणूक नियमबद्ध पाहिजे. आपल्या कर्तव्यास पोषक होईल अशीच दैनंदीन वागणूक माणसानें ठेवली पाहिजे. वाटेल त्यावेळीं वाटेल तें वाटेल त्या पद्धतीनें करणें हें त्याज्य आहे. अशा व्यक्तिपासून समाजाचें नुकसान होतें. अंती त्याचाही कांहीं फायदा होत नाहीं. अशा व्यक्तिपासून चार पावलें दूर राहावें. त्याची सावली आपल्यावर पडल्यास आपलें नुकसान होईल. त्यांच्याशीं मैत्री करूं नये. त्यांना आपल्या व्यवहारांतून बाजूस करावें. यासंबंधीं बाबा सांगतात—

**कांहीं केलें काय झालें । म्हणती जन ते समजा चळले ॥**
**धर्माचरण जयांनीं वर्जिलें । तयांस पहिले बर्जावे ॥**
**समोर येतां बाजूस जावें । महाभयंकर ते समजावे ॥**
**त्यांच्या छायेसही न राहावें । पडल्या सहावे कष्टही ॥**

॥ अ. ३ -- ७८।७९ ॥

### धर्माचरणाचें महत्त्व

धर्माचरण प्रत्येकाच्या मागें जन्मजात लागलेलें आहे. जो आपला धर्म ( religion ) तो प्रत्येकानें पाळला पाहिजे. समजून घेऊन पाळला पाहिजे. धर्म हा कांहीं केवळ चर्चेचा वा वादाचा विषय नाहीं. तो आचरणांत आणण्याचा विषय आहे. धार्मिक चर्चा ही आचाराला मार्गदर्शक होणारी असली पाहिजे. विद्वत्तेचे ताबूत मिरविण्यासाठीं केलेली चर्चा हा कालाचा अपव्यय होय. धर्माचा सदाचाराशीं घनिष्ट

संबंध आहे. एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू. मोक्ष वा स्वर्गप्राप्तीसाठीं एक वेळ राहू द्या पण निदान सदाचरणासाठीं तरी धर्माचरण प्रत्येकानें करणें अवश्यक आहे. प्रत्येकानें आपापल्या धर्माप्रमाणें वागावें. हें बाबांचें सांगणें. तुम्हाला माझी सेवा करावयाची असेल, माझी कृपा पाहिजे असेल तर आपला देव धर्म सोडा व मी सांगतो तो माना असें बाबांनी कधींही कोणालाही सांगितलें नाहीं. माझ्याकडे यायचें तर आपल्या गुरुकडे जातां नये, असें त्यांनीं नुसतें सुचविलेंही नाहीं. उलट असा भेद मानणें हा अज्ञान भ्रम आहे, अहंकार आहे हें त्यांनीं मुल्यांना त्यांच्या गुरुचें रुप आपल्या ठायीं दाखवून पटवून दिलें. सर्व धर्मांतून खेळती असलेली मानवता हा बाबांचा धर्म. तिच्या प्रस्थापनेसाठीं बाबा आले. मानवतेसाठीं धर्म सोडण्याची आवश्यकता त्यांना कधीं वाटली नाहीं. यामुळें प्रत्येकानें आपापल्या धर्माप्रमाणें आचरण करावें असें त्यांना वाटे. धर्म याचा अर्थ कर्तव्य असाही केला जातो. एकपरी असा अर्थ घेणें हल्लीच्या युगांत अधिक श्रेयस्कर ठरेल. कारण आजच्या परिस्थितींत, Life is strife यांतील Strife चा अनुभव आणून देणाऱ्या आजच्या जीवनांत स्वकर्तव्याला फार महत्वाचें स्थान आहे. धर्म ( religion ) स्वकर्तव्याच्या कोंदणांत बसविलेला असतो. बाबांनीं स्वकर्तव्यावर विशेष भर दिला आहे असें त्यांच्या जीवन चरित्रावरून व उपदेशावरून दिसून येतें. पूजादी धार्मिक विधीपेक्षां जीवनांत एकमेक एकमेकाशीं कसें लागतात, आपली कर्तव्यें किती तत्परतेनें करतात यावर समाजाचें हीत व पर्यायानें राष्ट्रहीत व व्यक्तीचें अध्यात्मिक कल्याण अवलंबून असल्यामुळें यासंबंधीं अधिक उपदेश व मार्गदर्शन बाबांनीं केलें आहे.

### ऋण हें फेडलेंच पाहिजे

समाज हा देवघेवीवर चालत असतो. व्यवहारांत देवाण घेवाण केल्याखेरीज तो पूर्ण होत नाहीं, यामुळें प्रत्येक व्यक्तीवर कोणाचेही श्रम न घेतां जगणारी व्यक्ति मुक्ताखेरीज मिळणें शक्य नाहीं. जें ऋण आहे तें फेडलें पाहिजेच. तें कोणासही चुकवतां येत नाहीं. या जन्मीं टाळलंत तर पुढील जन्मीं चुकवतां येणार नाहीं. कर्म, नियती कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें तुमच्याकडून तें फेडून घेईल. यासंबंधीं बाबांनीं स्वच्छ सांगितलें आहे.

**परि ऋण वैर आणि हत्त्या। कल्पांतीही न चुकती कर्त्या ॥**

ऋण फेडण्याच्या कल्पनेंतून निरनिराळी कर्तव्यें उत्पन्न झालीं. जन्मापासून मरेपर्यंत प्रत्येकाच्या मागें कांहीं ना कांहीं कर्तव्यें लागलेलीं असतातच. मुख्यतः चार प्रकारचीं ऋणें प्रत्येक व्यक्तीच्या मागें असतात. गुरुचें ऋण ( ऋषि ऋण ), आईवडीलांचे ऋण ( पितृ ऋण ) समाजाचें ऋण ( मानव ऋण ) व देव

ऋण. हीच गोष्ट निराळ्या मार्गेत सांगावयाची तर प्रत्येकाचें जीवन चार आश्रमांतून जात असतें. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम. वयपरत्वें हे भाग केले आहेत. आपल्यावर असलेल्या ऋणांची फेड करणें हें मानवी जीवनाचें ध्येय आहे. ज्या भागांत वा आश्रमांत आपण असूं त्याशीं संबंधीत असलेली कर्तव्यें योग्य प्रकारें पार पाडून ऋणमुक्त होणें हें आपलें कर्तव्य होय. ऋणांतून मुक्त झाला की तो नैतिक व अध्यात्मिक दृष्टया मोक्षास पात्र होतो.

## ऋषिऋण फेडलेंच पाहिजे

नाना तऱ्हेच्या कला, विद्या व संस्कृती यांचा लाभ आपण घेत असतां. या कलांचें विद्यांचें व संस्कृतीचें जतन व वाढ होण्यास आमच्या ऋषिमुनींचे, सद्गुरुचें, गुरुचे, साहित्तीकांचें व कलावंतांचे श्रम कारणीभूत झाले आहेत. परिस्थितीशीं झगडून व हालअपेष्ठा काढून आज हजारों वर्षें या गोष्टी या लोकांनीं जतन करून ठेवल्या व त्यांत वाढ करवून इतरांना त्यांचें दान ते करीत आले. यामुळें त्यांचे ऋण आपल्यावर आहे. हें ऋषिऋण होय. ब्रह्मचर्याश्रमांत नाना विद्या व कला शिकून त्यांत वाढ करणें, त्यांचें जतन करणें हें विद्यार्थ्यांचें आद्य कर्तव्य आहे. पुढें मोठेपणीं त्यांचा उपयोग इतरांच्या कल्याणासाठीं केला, विद्या व कला हस्तगत करण्यांत त्यांना मदत केली, विद्या व कला यापासून मिळणारे सुख व आनंद त्यांनां उपलब्ध करून दिला कीं ऋषि ऋणांतून मानव मुक्त होतो. वास्तव भावी कालांत स्वतांच्या व इतरांच्या उपयोगी व्हावीत म्हणून विद्यार्थी दशेंत असतांना ज्ञानार्जन करून ब्रह्मचर्य संयम व शिस्त यांच्या पालनानें व योग्य आहारविहार विचार व व्यायाम यांच्या साह्यानें मन बुद्धि व शरीर यांची वाढ व जोपासना करणें हें विद्यार्थ्यांचे प्रथम कर्तव्य आहे. चिन्यांच्या पासुन भारताला जेवढा धोका आहे त्याच्या सहस्त्रपट धोका ब्रह्मचर्यांच्या अभावामुळें भारतीय तरुणांची मने व शरिरे आतून पोखरणाऱ्या वासनामय किड्याचा आहे. क्षय वा मलेरीयामुळें जेवढी पोखरण शरिराची होत असेल त्याच्या किती तरी पट पोखरण ब्रह्मचर्यांच्या अभावामुळें होत आहे. Vitality म्हणून ज्याला म्हणतात ती आमच्यांतून दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. ओज व तेज मावळून नेभळटपणा फिकेपणा आला आहे. ही राष्ट्रीय भयावह स्थिति हटविण्यास पेटंट, इन्जेक्शन्स, बी कॉम्प्लेक्स हे उपाय नसून ऋषिऋण फेडण्याची कल्पना प्रत्यक्षांत उतरविणें व ब्रह्मचर्याश्रमांतील कर्तव्यें चोख रीतिनें पार पाडणें हे आहेत.

## तसेंच मातापित्यांचें ऋण

एका जुन्या कवीचे 'आई किती थोर तुझे उपकार' हे उद्गार पितृऋणाचे दर्शक आहेत. आईवडिलांचे ऋण कोणावर नाहीं ? माता ! स्वार्थत्यागाची मूर्तिमंत

प्रतिमा ! बाळ ! तो मोठा व्हावा सुखी व्हावा यासाठीं हालअपेष्टा काढणारी ती देवी ! जन्मा आधींपासून तों तो सुखानें संसार करावयाला लागेस तोंपर्यंत व नंतरही त्याच्या हितासाठीं, बऱ्यासाठीं, कल्याणासाठीं वेदना, दुःखे, हालअपेष्टा सहन करणाऱ्या मातेचें ऋण आपल्यावर नाहीं असें कोणता सुपुत्र म्हणेल बरें ? आपण आज जे आहोंत तें तिच्या सहनशीलतेचें फळ आहे असें मोठेपणीं कितीजणास वाटतें ? आपल्या शिक्षणासाठीं वडिलांनीं पैसा खर्च केला, त्यासाठीं श्रम केले म्हणून आज आपण वैभवानें मिरवीत आहोंत असें कधीं तरी आपल्या मनांत येतें काय ? आज आपण जे आहोंत ते आईवडिलांच्या श्रमाचे, जोपासनेचे व मार्गदर्शनाचें फळ आहे. यास्तव त्यांचे आपण ऋणी असले पाहिजे. हें पितृ ऋण. आपण तें फेडावयास नको काय ? तें कसें फेडावयाचें ? गृहस्थाश्रमांत आल्यावर त्याची परत फेड करावयाची असते. आई–वडिलांच्या मालमत्तेचे आपण वारसदार आहोंत हें सर्व मुलांना समजतें. वेळ प्रसंगीं त्यासाठीं भांडणें कोर्टकचेऱ्याही करावयास ते कमी करीत नाहींत. परंतु मालमत्तेप्रमाणें त्यांच्या संसाराचेही आपण वारसदार आहोंत हें मात्र अलीकडील तरुणांच्या फारसे ध्यानांतही येत नाहीं. गृहस्थाश्रमांत प्रवेश केल्यावर संसाराची जबाबदारी पत्करून, ती योग्य प्रकारें पार पाडून, आईवडिलांचा, त्यांच्या म्हातारपणीं, त्यांनीं आपल्या बालपणीं आपला जस प्रेमानें संभाळ केला तसा संभाळ करून, नीतिधर्मयुक्त प्रजोत्पत्ती करून, आपल्या मुलाबाळांना योग्य शिक्षण देऊन, त्यांना सुसंस्कृत करून, त्यांची योग्य जोपासना करून, भावी आयुष्यांतील ध्येय गाठण्यास त्यांना मदत करून व मार्गदर्शन करून हें पितृऋण फेडावयाचें असतें. केवळ राजाराणीच्या सुखाच्या संसारानें पितृऋणाची फेड होत नाहीं.

## समाजऋण व देवऋण

पितृऋणाप्रमाणें समाजऋण व राष्ट्रऋणही आपल्यावर असतें. आपणाला लहानाचे मोठे करण्यांत, सुरक्षितता देण्यांत व आपलें पोषण करण्यांत यांचाही मोठा वाटा आहे. हें मानवऋण होय. यास्तव गृहस्थाश्रमांत व पुढें वानप्रस्थाश्रमांत व समाज व राष्ट्रसेवा विनामूल्य निष्ठेनें करून हें ऋण फेडणें आपलें कर्तव्य आहे, आपलें जीवन सुखी करण्यांत केवळ आईवडील, समाज वा राष्ट्र हीच तेवढी कारणीभूत आहोंत असें नव्हे तर अखिल जगताच्या कल्याणासाठीं झटणाऱ्या अनेक दिव्य शक्ति तसेंच सर्वांचे मूळ जी आदिशक्ति ह्याही आपलें जीवन सुखी, समृद्ध व सुरक्षित करण्यास कारणीभूत आहेत. त्यांचेंही ऋण आपल्यावर आहे. तें देवऋण होय. वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रमाच्या काल विभागांत आपण गेल्यावर आपल्या सर्व वासनांचा क्षय करून, नाना दिव्यशक्तींचें व आदिशक्तीचें चिंतन करून ईश्वरी भक्तीची कास निष्ठेनें धरून, होईल तेवढे मानव कल्याण करण्यासाठीं जी बुद्धि व जे शरीर आपल्यापाशीं

असेल त्याचा निःस्वार्थीपणानें उपयोग करीत राहिल्यानें देव ऋणांतून मुक्त होता येतें. अशा प्रकारें आयुष्याच्या निरनिराळ्या टप्प्यावर जी कर्तव्यें आपल्या वाट्यास येतात ती कसोशीनें केली पाहिजेत. आपली बुद्धि, मन, शरीर व पैसा केवळ आपल्यासाठीं नसून इतरांसाठीं, कुटुंबासाठीं, समाजासाठीं, राष्ट्रासाठीं, मानवतेसाठीं व त्या जगन्नियंत्यासाठीं आहे व तसा त्यांचा उपयोग करणें हें मानवी आयुष्याचें ध्येय होय. धर्माचरणानें व्यक्ति, समाज व राष्ट्र यांच्यावर दूरगामी परिणाम होत असल्यामुळें धर्माचरण सोडणें बाबाना पूर्ण नापसंत होतें. म्हणूनच ते स्पष्ट सांगतात—

**धर्माचरण जयांनीं वर्जिलें । तयांस पहिले वर्जावें ॥**

## शीलं परं भूषणम्

शील हें परम पवित्र समजलें पाहिजे. माणसानें आपलें शील प्राणापलीकडे सांभाळलें पाहिजे. जे शीलवान आहेत ते देवाला जवळ आहेत. शील भ्रष्टांची संगत टाळावी. विचारहीन वागणूक माणसाला फलदायी होत नाहीं. बुद्धि आहे तर तिचा उपयोग केला पाहिजे. जें कांहीं करावयाचें तें विचारपूर्वक केलें पाहिजे. कोणी कांहींही सांगो. आपण आपली बुद्धि कायम ठेवून त्यांतील तथ्यातथ्य तपासून पहावें. सद्‌गुरुखेरीज बाबा वाक्यं प्रमाणं पद्धत नेहमीं उपयोगी नाहीं. असें न केलें तर लोकांच्या थापांना भुलून आपण लबाड लोकांच्या संगतींत सापडूं व आपलें नुकसान होईल. कोणतीही गोष्ट करतांना चांगल्या वाईटाकडे लक्ष देणें जरूर आहे. जें आपण करतों तें योग्य कीं अयोग्य हें नेहमीं माणसानें पाहिलें पाहिजे. व्यवहारांत चांगलें वाईट, योग्य अयोग्य निवडता येणें ही एक कला आहे व ती प्रत्येकानें आपल्या बुद्धि-नुसार हस्तगत करून घेतली पाहिजे. जें ज्यावेळीं योग्य असेल तेंच करण्याची हातोटी आपण साधली पाहिजे. व्यावहारीक नीति सदैव बदलणारी असते. आजचें उद्याला नाहीं. यास्तव कोणत्या वेळीं कोणतें योग्य हें समजले. सारासार विचार बुद्धिचा वापर केला पाहिजे. यांत आपलें कल्याण आहे. आचारहीन शीलहीन वा विचारहीन माणसाचें कल्याण होणें नाहीं. यास्तव आपण आपले आचार विचार व उच्चार पवित्र ठेवण्याकडे कसोशीनें लक्ष दिलें पाहिजे. हें ज्यांस साधलें तो ईश्वरीकृपेस पात्र होऊन सुखी झाल्याखेरीज रहाणार नाहीं. शीलभ्रष्ट, विचारहीन, आचारहीन, धर्माचरण सोडणारे, बेछूट वागणारे असे जे आहेत त्यांना उद्देशून बाबा विचारतात—

**आचारहीन शीलभ्रष्ट । विचारहीन कर्मनष्ट ॥**
**देखेना जो इष्टानिष्ट । केवीं तो अभिष्ठ पावेल ॥** अ. ३-७९,८०

# गुरु नानक यांचा पंथ व शिकवण

लेखक : ईश्वरसिंह ठाकूर

**गुरु नानकजी हे पांचशें वर्षापूर्वीच्या काळांत होऊन गेलेले सत्पुरुष व शीख धर्माचे संस्थापक. त्या काळांत जनतेची संघटना घडवून आणून त्यांना स्वोद्धाराचा व राष्ट्रोद्धाराचा मार्ग दाखविण्याची जी कामगिरी पार पाडली तिला त्या काळांत तरी तोड सांपडणें कठीण. श्री. ईश्वरसिंह ठाकूर यानीं त्यांच्या शिकवणीचा सखोल अभ्यास केला असून आमच्या वाचकांसाठी त्यांनीं लिहिलेला पुढील लेख सादर करण्यांत येत आहे.**

श्रीगुरुग्रंथांतील बाबा नानक ह्यांच्या वाणीचा यथाशक्ती अभ्यास करून जीं मतें मी बनविलीं आहेत तीं पुढें दिलेलीं आहेत. कोणाही जिज्ञासूनें निर्विकार मनानें अभ्यास केला तर तोहि ह्याच निष्कर्ष काढील. त्यांची रचना प्रथम क्लिष्ट वाटते; त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर आणि दूरवर पश्चिमेकडे इराक, अरबस्तानांत आणि पूर्वेकडे चीनपर्यंत, तसेंच उत्तरेस हिमालयाच्या पार तिबेटांत व दक्षिणेस लंका आणि दक्षिण महासागरांतल्या इतर बेटांत सुमारें चाळीस वर्षें प्रचारासाठीं दीर्घ प्रवास केल्यानें त्यांच्या रचनेंत असंख्य शब्द निरनिराळ्या नावांचे आलेले आहेत. त्या शब्दांना त्यांनीं हवें तसें रूप देऊन आपल्या कामीं लावलेलें आहे. तथापि सरावानें आणि संदर्भ ध्यानीं आणून त्यांच्या वृत्तींशीं एकरूपता साधली तर भावार्थ ध्यानीं येतो आणि मग जो ज्ञानानंद होतो तो ब्रह्मानंदाची बरोबरी करूं शकतो.

१ ) तत्कालीन भारताची दुःस्थिति नष्ट करण्यासाठीं राज्यकर्त्यांच्या दमननीति-पेक्षांहि स्वजनांच्या दुर्बलतेचा त्यांना अधिक तिटकारा येई. पिढ्यानुपिढ्या धार्मिक गुलामगिरींत गेल्यानें मुर्दाड बनलेल्या भारतीय मनाला सन्मार्गं प्रवृत्त करण्यासाठीं जो प्रचंड खटाटोप त्यांनीं केला त्यावरून ते भारतीयांच्या स्वधर्माचे विनाशक नसून सुधारक होते अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे.

## पाखंडी लोकांवर प्रहार

२ ) वेदांतील उपासना आणि उपनिषदांतील तत्वज्ञान ह्यांविरुद्ध त्यांनीं कोठेंहि विरोधी शब्द काढलेला माझ्या पाहाण्यांत नाहीं. हरिद्वारीं गंगेच्या पाण्यांत उभे राहून सूर्यासन्मुख पितरांना पाणी देणारांचा निषेध म्हणजे सूर्योपासनेचा निषेध नसून पितरांच्यासाठीं पाणी, तीळ, पिंड देण्याच्या अज्ञानजन्य कर्मकांडाचा तो निषेध होता. यंत्राप्रमाणें नित्य आरतीची कवायत करणाऱ्या जगन्नाथाच्या पुजाऱ्यांना त्यांनीं सगळी सृष्टी करीत असलेली प्रभूची आरती ( 'गगनमय थाळ, रविचंद दीपक बने' ) गाऊन त्याच्या अपरंपार महतीचें ज्ञान दिलें. अर्थहीन रूढ अवडंबरांचा मोड केल्याखेरीज प्रभूचें सत्यस्वरूप जगाला कळलें नसतें आणि तो एक जगत्पिता व आपण सारीं त्याचीं लेकरें ही जाणीव निर्माण झाली नसती. पाखंडी लोकांनीं वेदाच्या अभिमानाचा बाह्य डौल धारण करून त्यांतील तत्वें स्वतः लाथाडली, आणि वेदाभ्यास तर दूरच राहिला—वेदवाणी ऐकणाऱ्या शूद्रांच्या कानांत शिशाचा रस ओतण्याचा धाक घातला. मानवी मनाला ईश्वरी ज्ञानाची जन्मजात भूक लागलेली असते. ती स्वधर्मीय पुरोहितांनीं मारून टाकण्याचा अट्टाहास केल्यानें परधर्मी मुल्लामौलवींना कोट्यावधि हिंदूंना स्वतःकडे खेचून घेण्याचें हें जाळें अनायासेंच मिळालें. "वेदामहि नामु उत्तमु सुणहि नही फिरहि जिउ बेतालिया ।" ( वेदांत वर्णिलेल्या परमेश्वराचें स्वरूप समजून घेत नाहींत, आणि पिसाळल्यासारखे सैरावैरा ( कर्मकांडी थोतांडांच्या मागें धांवत सुटले आहेत ! )

## एक राष्ट्रनिर्मितीचा पाया

३ ) जातीपाती मोडून एकराष्ट्र निर्मितीची कामगिरी अजूनही आपल्या राष्ट्राला साधलेली नाहीं. पंजाबांत ( विशेषतः नानक पंथांत ) आज सतत पावणे पांचशें वर्षांपासून गुरुद्वारांमध्यें हजारों लोक उचनीच भेद मोडून एका पंगतीत जेवत आलेले आहेत. एकाच स्वयंपाक गृहांत तयार झालेलें अन्न सर्वांना एकाच भोजन गृहांत शेजारीं बसवून वाढण्यांत येत असतें. सरदारांच्या शेजारीं हातीं कटोरा घेऊन भीक मागणारा आंधळा भिकारी जेवीत असलेला पाहून डोळ्यांचें पारणें फिटतें. आतां महाराष्ट्रांत सुद्धां पुष्कळ गुरुद्वारें झालीं असून तेथील मुक्तद्वार सहभोजनांचा लाभ घेतलेल्या महाभागांत पुणें विश्व विद्यालयाचे कुलगुरू म. म. दत्तो वामन पोतदार आणि पुणें महानगर पालिकेचे महापौर श्री. बाबुराव जगताप हेहि आहेत. हिंदु मुसल्मान, पार्शी, खिश्चन हे सगळे शीखांच्या बरोबरीनें पंगतीत बसतात. वेदाचा 'सहनौभुवक्तु'चा संकल्प बाबा नानक ह्यांनी खरा करून दाखविला असून त्यामुळें जें अभंग बंधुत्व उत्पन्न झालें तें सर्व संकटांना जिंकून यशस्वी ठरलें.

४ ) तत्वज्ञानाचें शास्त्रीयवाद लढवीत न बसतां प्रभूची प्रार्थना आणि जनतेला सदुपदेश करतां करतांच प्रसंगोपात् पाखंडखण्डनाचे आणि सिद्धांत निरूपणाचे प्रसंग सहजासहजींच गुरू नानकांच्या वाणींत साधलेलें दिसून येतात. अडतीस स्तोत्रें आणि दोन श्लोक असलेलें त्यांचें सुप्रसिद्ध ' जपजी ' म्हणजे दुसरें ' ईशावास्योप निषद्च ' ठरलें आहे. ' ईशावास्यमिंद सर्वम् । ' हा मध्यवर्ती सिद्धांत ' पाताला पाताल लख आगासा आगास । ' ह्या बावीसाव्या स्तोत्रांत सांगतांना ते म्हणतात ' असुळ इकु धातु । ' ( अनंत ब्रह्मांडें असून तिचें मूळ परब्रह्म तें एकच सर्वत्र भरलेलें आहे. )

## संसारांत राहून ईश्वर भक्ति

५ ) सत्स्वरूप परमात्म्यानें निर्माण केलेलें जगहि सत्य असल्यानें ' माया ' म्हणून त्याचा धिःकार न करतां त्याच्यांतच राहून आपलीं कर्तव्यें निर्लेप बुद्धीनें पार पाडलीं पाहिजेत, ह्यावर गुरु नानकांचा मोठा कटाक्ष आहे. ' सचे तेरे खंड सचे ब्रह्मंड । ' आणि म्हणून मानवजन्माची पूर्णता गृहस्थी जीवनांतच साधण्याचा त्यांनीं सतत उपदेश केलेला आहे. आपल्या दोन्ही सन्यासमार्गी पुत्रांना गादीचा वारसा न देतां कठोर कसोटीवर पारखून सुयोग्य ठरलेल्या सच्छिष्याला ' अंगददेव ' नांव देऊन त्याला आपला उत्तराधिकारी त्यांनीं केला.

६ ) मूळ ईश्वरी मार्गापासून जन्ममरणांचे फेरे फिरत दूर भटकत गेलेल्या मानवी जीवांना त्यांनीं दिलेल्या स्वोद्धाराच्या सन्मार्गाचें स्वरूप साररुपानें असें सांगतां येईल ( अ ) नामजपो ! नामोपासना करा, अनन्यभावानें प्रभूला शरण जा आणि देहभान विसरून अष्टभाव दाटून आणणारी नामोपासना करा.) ( आ ) करितकरो. ( श्रमकरून पोटभरा. अन्यायानें व अनीतीनें धनसंचय न करतां सन्मार्गानें घाम गाळून जीवन चालवा. ( इ ) वंड चखो ! ( वाटून खा. कुटुंबांतील सर्वांनीं मिळून संतोषानें सुखोपभोग घ्यावा. दुःखानें कमावून सुखानें खावें ).

७ ) बाह्यावडंबरी निरर्थक क्रिया कर्मांतरांत वाया जाणारा वेळ, धन व श्रम मानव्याच्या सेवेंत आणि परमेश्वराच्या प्रेमभक्तींत खर्च केला पाहिजे.

## स्वातंत्र्याचें प्रेम

८ ) आज पांचशें वर्षांनंतर ज्या सत्प्रवृत्ति जगांत रूढ झालेल्या दिसत आहेत, समानता, बंधुता, एकेश्वरी उपासना, लोकमतानुवर्तित्व इत्यादि-त्यांचें मूळ गुरु-नानकांनीं केलेल्या उपदेशांत दिसून येत आहे. ईश्वर एक आहे, म्हणून सर्व मानव एक समाजाचे घटक असून सर्व धर्म ईश्वराकडे नेणारे पंथ आहेत.

१ ) सर्व मानवांच्या कल्याणासाठीं नित्य झटत असतां भारताच्या तत्कालीन राजकीय दुस्थितीनें त्यांना अत्यंत दुःख होत असल्याचें दिसून येतें. बाबराच्या चौथ्या स्वारीच्या प्रसंगी ( इ. स. १५२४ ) लाहोर शहराची जी दुर्दशा झाली ती एका ओळींत त्यांनीं लिहून ठेवली आहे. 'लाहोर सहर कहर जहर सवा प्रहर।' ( लाहोर शहरावर सव्वाप्रहर कहर कोसळला. ) त्यानंतरचा प्रसंग रस्त्यांत येणाऱ्या गांवांत कत्तल, लूट, आग, अनाचार, अत्याचारांचा असून तो बाबांनीं स्वतः पाहिलेला होता. देवाकडे हें गाऱ्हाणें सांगतांना ते म्हणतात 'खुरासान खसमाना कीया हिंदुस्तान डराया।' ( खुरासानाला तूं लाडका करून हिंदुस्थानाची अवहेलना केलीस ! ) हिंदुस्थान हा आसेतुहिमाचल एकच देश असून तो आपणा सर्व हिंदी लोकांचा स्वदेश आहे ही जाणीव त्या गुलामगिरीच्या कटु काळांत बाबाखेरीज इतर फार थोड्या माणसांना झाली असेल.

## पंजाबाला सिंह बनविणारे नानकजी

भारतावर परक्यांच्या ज्या स्वाऱ्या झाल्या त्या प्रत्येक वेळीं पंजाबाची धूळधाण उडालेली आहे. अशा सर्वतोपरी गांजलेल्या आणि निर्माल्य बनलेल्या पंजाबाला भारताचा संरक्षक करण्याची जी प्रचंड ऐतिहासिक कामगिरी झाली तिला जगांत तोड नाहीं. तिचा पाया गुरु नानकांनीं रचून कळस गुरु गोविंद सिंहजी ह्यांनीं ठेवला.

मूळ वैदिक संस्कृतीचा पंथ असलेला शीख समाज आतां संपूर्ण वेगळाच दिसतो. ह्याचीं कारणें अनेक आहेत. साक्षर होण्याचा सर्व मानवांचा जन्मसिद्ध हक्क मारून ब्राह्मणांनीं ज्ञानाची जी कोंडी केली होती ती मोडण्यासाठीं पंजाबी भाषा आणि जोडाक्षर रहित गुरुमुखी लिपीचा सर्रास प्रचार दुसरे गुरु श्री अंगद देवजींच्या काळीं जो झाला तेथून अलग होण्याच्या प्रवृत्तीचा प्रारंभ झाला. चौथे गुरु श्री रामदासजींनीं हरिद्वार, प्रयाग, काशी, जगन्नाथ ह्यांच्या जागीं अमृतसर तीर्थाची जी निर्मिति केली तो दुसरा प्रसंग वेगळेपणा निर्माण करणारा. तिसरी प्रवृत्ति पांचवे गुरु श्री अर्जुन देवजी ह्यांनीं शीखांसाठीं एका महान ग्रंथाचें संपादन केल्यानें सुरू झाली. तो ग्रंथ लोकांच्या बोलभाषेंत मधुर व रसाळ पद्यांचा असल्यानें त्याच्या खेरीज दुसऱ्या कशाचीहि शिखांना गरज उरली नाहीं. शेवटीं दहावे गुरु श्री गुरु गोविंदसिंघजी ह्यांनीं शीख समाजाचें बाह्य स्वरूप सर्वस्वी बदलून त्यांना 'सतशिपायी' केल्यानें आतांचा पंचककार धारी 'सिंघ' पदवी लावणारा शिष्य 'खालसा' समाज झाला आहे.

तथापि वैदिक संस्कृतीचा वारसा तो विसरला नसून देशाची फाळणी झाल्यानंतर तो सर्व देशभर पसरून देशाच्या सुख दुःखांशीं एक झाला आहे. दया असो परमेश्वराची ! अजूनही तो आपलें ऐतिहासिक कार्य पुढें करीतच राहाणार आहे. धन्य गुरुनानक देव; धन्य, धन्य, धन्य !

---

# एकनाथस्वामीस देवदर्शन कसें झालें ?

—आप्पाराव

**भगवद्भक्त एकनाथ ( १५२३ ते १५९९ ) सर्वांच्या परिचयाचे आहेत. संतांमध्यें त्यांचें स्थान अनेक कारणांमुळें फार उच्च आहे. जनार्दनपंत हे त्यांचे गुरुजी. त्यांच्या नजरेखालीं त्यांनीं ईश्वरभक्तीचा संसार थाटला. त्यांची अभंगरचना फार मोठी आहे. प्रत्येक अभंगाशी त्यानीं आपल्या गुरुजींचें नाव निगडीत केलें आहे. जगांत राहून, संसारांत वावरून आपलें व्यवहार निटनेटके कसे करावे, त्यांच्यापासून कमलपत्रांप्रमाणें अलिप्त कसें रहावें व सर्वांच्या सुखास कारण होऊन देव कसा प्राप्त करून घ्यावा हें एकनाथानीं सर्वांना दाखवून दिलें. ते खऱ्या अर्थानें ' स्थितप्रज्ञ ' होते.**

एकनाथस्वामींची व भगवंताची भेट कशी झाली व सतत बारा वर्षे भगवंतानेंच भक्तीला वश होऊन त्यांची सेवा कशी केली याची माहिती करून घेण्यासारखी आहे.

### बालपणींचे खेळ

एकनाथांचा जन्म पैठण नगरींत झाला. लहानपणींच त्यांच्या आईवडिलानीं इहलोकींची यात्रा संपविली व त्यांचें लालन-पालन आजोबा चक्रपाणी यानीं केलें.

लहान मुलें भारी खेळाडू असतात. आणि मुलांच्या बाबतींत खेळणें हें स्वभावसिद्ध असतें. परंतु बाळ एकनाथ मात्र तसा नव्हता. त्याचें खेळाशीं फारसें सख्य नव्हतें. होय; तो खेळ खेळायचा ते कसले ? दगड जमा करायचे; त्यांच्याठायीं देव आहे असें मानून त्यांना फुलें, पानें वहायचीं ! हा होता त्याच्या खेळाचा नमुना !

लहानपणापासून एकनाथाला कीर्तन ऐकण्याची व भजनांत भाग घेण्याची भारी हौस ! बाळपणापासून सारें लक्ष देवभक्तीकडे. भक्त भानुदास त्याच घराण्यांत पूर्वी होऊन गेलेला. ( मागील अंकांतून त्या संत पुरुषाचा परिचय करून देण्यांत आलेला आहेच. )

एकनाथाचे आजोबा चक्रपाणी, आपल्या नातवाच्या हालचाली बारकाईनें पहात होते. त्याना नातवाच्या वागण्याचें मोठें कौतुक वाटायचें. ते म्हणायचे, हा भानुदासच जन्माला आलेला आहे.

वारकऱ्यांचा मेळा विठ्ठल नामाचा गजर करीत जात असलेला पाहिला म्हणजे एकनाथाचें मन भक्तिभावानें उचंबळून यावयाचें! हातांत एखादी काठी घेऊन व तिला भगवा फडका बांधून विठ्ठल, विठ्ठल करीत त्यानें चार पावलें चालत जावें व आम्हीं पंढरपुरास चाललों असें म्हणावें.

## गुरुजींच्या भेटीसाठीं

नामस्मरण, नैमित्तिक संध्या, त्यानें मोठ्या आवडीनें करावी. कथा कीर्तनें ऐकण्याचा सपाटा चालू होताच. माणसाला गुरुशिवाय तरणोपाय नाहीं. नाहींपेक्षां जगणें, मरणें, पुन्हां जन्माला येणें पुन्हां जन्म घेणें या वर्तुळांतून सुटका होणें कठीण!

एकनाथानें ही गोष्ट मनाला लावून घेतली. तो बेचैन झाला! आहे काय या जन्मांत? देव भेटला नाहीं तर हा जन्म काय कामाचा?

पण गुरुच्या मार्गदर्शनाशिवाय देवप्राप्ति कशी होणार? तेव्हां प्रथम गुरुची प्राप्ति करून घेतलीं पाहिजे. आणि ती तरी सोपी का आहे? कुठें जायचें गुरुच्या शोधार्थ? आणि तो कुठें आणि कसा सांपडणार? गुरु पाहिजे एवढें मात्र खरें!

देवाचें नाव घेत रहावें म्हणजे तोच मन कामना पूर्ण करता एवढें माहीत झाले होते एकनाथाला! तेव्हां त्याची करुणा भाकावी. त्याला प्रसन्न करून घ्यावा. म्हणजे तोच मार्ग दाखवील. तेव्हां त्यानें स्वतःसाठीं एक कार्यक्रम आखला. देवळांत जाऊन बसायचें व भक्तिभावपूर्वक देवाच्या नावाचें चिंतन करावयाचें.

एकनाथाचा हा कार्यक्रम दृढनिश्चयपूर्वक सुरू झाला. किती दिवस माहीत आहे? सतत सात दिवस!

त्याची चिकाटी व निष्ठा दांडगी होती. ती लेचीपेची किंवा वरकरणी नव्हती.

मग देव कां नाहीं प्रसन्न होणार? त्याला कुठून तरी प्रेमळ शब्द ऐकू आले. "काय पाहिजे तुला? गुरूच ना! मग देवगडला जा. तेथें जनार्दनस्वामी रहातात. प्रत्यक्ष दत्तमहाराजानीं त्याला अनुग्रह दिलेला आहे. जा आणि त्यांचे पाय धर!

## जनार्दनस्वामींची भेट

पैठणपासून देवगड फार लांब नव्हतें. अवघें वीस मैलांवर! एकनाथाला आनंद झाला. गुरूचीं व आपली भेट होणार आणि जन्म मरणाच्या फेऱ्यांतून आपली सुटका

होणार ! तो आनंदानें बेहोष झाला. केव्हां एकदां देवगडला जाऊन जनार्दनस्वामींची भेट घेतों असें झालें होतें त्याला !

एके दिवशीं पहांटेच्या प्रहरीं एकनाथ आजोबा किंवा आजी यांना जाग लागूं न देतां देवगडला निघून गेला.

' देवाचिया भेटीसाठीं । पडाव्या जिवलगांच्या तुटी । '

नात्यागोत्याची माणसें; हा सारा गोतावळा ठीक आहे. परंतु आपलें ध्येय गांठण्यासाठीं त्यांचा काय बरें उपयोग ? तेव्हां एक दिवस कधींतरी मन कठोर हें केलेंच पाहिजे ! तशीच उपरति एकनाथला त्या वयांत झाली ! पूर्वपुण्याई आणि दुसरें काय ?

बहुत सुकृताची जोडी । म्हणून विठ्ठल आवडी ॥

जनार्दनस्वामी हे मुसलमान राजाच्या नोकरींत होते. ते मूळ चाळीसगांवचे रहाणारे, त्यांचें आडनांव होतें देशपांडे. नोकरीविरहीत सारा वेळ ते देव चिंतनांत व ध्यानधारणेंत घालवीत असत. श्रीदत्तमहाराजांची व त्यांची जरूर तेव्हां भेटगांठ व्हायची व त्यांचें बोलणेंही व्हायचें. केवढी त्यांची थोरवी सांगावी ?

अशा जनार्दनस्वामींच्या घरीं एकनाथ आले व पहातांच त्यांना लोटांगण घातलें. म्हणाले, "महाराज ! आपली सेवा घडावी अशी फार इच्छा आहे. तेवढी कृपा व्हावी."

जनार्दनस्वामी अंतर्ज्ञानी होते. त्यांनीं एकनाथला ओळखलें व त्याला आपल्या-सन्निध रहाण्याची परवानगी दिली. एकनाथ त्यांच्याजवळ राहून त्यांची मनोभावें व एकनिष्ठपणें सेवा करूं लागले.

### अमृतानुभवाचें पठण

ज्ञानदेवांचा अमृतानुभव हा ग्रंथ म्हणजे जनार्दनस्वामींच्या नित्य पाठांतला. ते तो ग्रंथ वाचूं लागले म्हणजे एकनाथानीं त्यांच्याजवळ बसून लक्षपूर्वक ऐकावा.

जनार्दनस्वामी कधीं कधीं आपल्या कचेरींतील अपुरें राहिलेलें काम घरीं घेऊन येत असत व तें एकनाथांच्या स्वाधीन करीत असत. एकनाथ तें मन लावून पूर्ण करायचा.

---

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ' लायसॉफ तेल ' वापरा.
गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी

एकदां मोठी गंमत झाली. हिशोब तपासीत असतां अर्ध्या पैशाची चूक कुठें झाली त्याचा कांहीं केल्या पत्ता लागेना. एकनाथानें जंग जंग पछाडलें, परंतु छे! हिशोब कांहीं जुळेना; आणि अर्ध्या पैशाची चूक सांपडेना. एकनाथानें सबंध रात्र हिशोब तपासण्यांत घालविली. रात्र संपली आणि सकाळ झाली. त्या सकाळच्या रामप्रहरीं एकनाथाला चुकीचा पत्ता लागला आणि जो काय आनंद झालाय म्हणता! त्यानें त्या भरांत कडाडून टाळ्या वाजविल्या!

जनार्दनपंताचें लक्ष एकनाथाच्या हालचालीकडे होतेच. टाळ्यांचा आवाज ऐकतांच त्यांनीं विचारलें, "काय रे! एकाएकी कसला आनंद झाला एवढा! उगाच नाहीं कोणी टाळ्या वाजविणार!"

"खरं आहे महाराज! टाळ्या वाजवायला तसंच कारण झालें. चूक लहानच; अर्ध्या पैशांची! परंतु ती कांहीं केल्या उमगतच नव्हती. ती सांपडली एकदांची आणि माझा आनंद माझ्यांत मावेना. तो टाळ्यांच्या रूपानें प्रगट झाला!" एकनाथानें सांगितलें.

## गुरुजींचा उपदेश

"असं का?" महाराज म्हणाले, "एकनाथ ती चूक शोधुन काढण्यांत तूं अगदीं एकतान झाला होतास. त्याच गुंगींत तूं होतास! तीच एकतानता, तीच गुंगी तूं जर का ईश्वर भजनांत दाखवूं शकलास तर काय बहार होईल! इथें एकतानता, निष्ठा, श्रद्धा लागते. ती ज्याला साधली तो जिंकला! त्यानें आयुष्यांत जय मिळविला असें म्हणतां येईल.

गुरुजींचा तो सदुपदेश कानीं पडतांच एकनाथाच्या दैनंदिन वृत्तींत थोरपालट घडून आला.

श्रीदत्तमहाराजांची भेट व्हावी व ती व्हावी यासाठीं एकनाथ गुर्वाज्ञेप्रमाणें आपलें सारें लक्ष त्या ध्येयसिद्धीकडे लावूं लागले. तोंच एकमेव ध्यास आणि रात्रंदिवस तेंच चिंतन!

त्यांची एकात्मता व निष्ठा जनार्दनस्वामी अत्यंत बारकाईनें पहात होते. जवळच एक उंच टेकडी होती. त्या टेकडीवर एकदां ते एकनाथास घेऊन गेले. त्या टेकडीवर एक सुंदर सरोवर होतें.

**श्रीदत्तमहाराजांची भेट**

जनार्दनस्वामी एकनाथास म्हणाले, "हें स्थान किती नयनमनोहर आहे. नाहीं का ? श्रीदत्तमहाराजांचें हें आवडतें स्थान आहे. येथें ते वारंवार येतात; परंतु विविध रूपें धारण करून ! तूं घाबरून जायचें नाहीं बरं का ?

एके दिवशीं दोघेही असेच त्या टेकडीवर गेले असतां मुसलमान फकिराच्या वेषांत दत्त महाराज तेथें आले ! जनार्दनस्वामींनीं त्यांना ओळखलें व त्यांनीं त्यांस साष्टांग प्रणीपात केला. आणि म्हणाले, "महाराज ! एकनाथ आपल्या दर्शना-साठीं भुकेला आहे. त्याला कृपा करून आपल्या नेहमीच्या वेषांत दर्शन द्यावें व त्याच्या डोळ्यांचें पारणें फेडावें."

जनार्दनस्वामी दत्त महाराजांचे परमभक्त. त्यांच्या विनंतीस अनुसरून महाराजानीं एकनाथास आपल्या नेहमींच्या वेषांत दर्शन दिलें.

एकनाथांच्या जीवनांतील भगवंत भेटीचा तो पहिलाच प्रसंग होता. त्या दर्शन-लाभानें त्याचें सर्वांग रोमांचित झालें. त्यांना अननुभूत आनंद झाला. जीवनाचें सार्थक झालें असें त्यांना वाटूं लागलें.

एकनाथांचें आतां सारें लक्ष ईश भक्तीकडे लागून राहिलें होतें. त्याला तहान भुकेचीही आठवण रहात नसे. त्याची ती अनन्य भक्ति पाहून देव प्रसन्न झाले. एकदां ब्राह्मणाचें रूप धारण करून देव त्यांच्याकडे आले आणि म्हणाले, मी गरीब ब्राह्मण आहें. मला आपली सेवा करायची आहे. आपली सारीं कामें मी करीन.

तेव्हां एकनाथ म्हणाले, तुला माझ्याबरोबर रहायचें असेल तर खुशाल रहा; परंतु माझीं कामें मी करीन. मला दुसऱ्याच्या सेवेची जरूरी नाहीं."

**ब्राह्मणाचा आग्रह**

यावर तो ब्राह्मण म्हणाला, "काम केल्याशिवाय माझ्यानें कसें रहावेल. फुकट खाणें मला पसंत नाहीं. मी पाणी भरीन, कपडे धुवीन, जेवण खाण करीन."

एकनाथानीं त्याला नांव विचारलें असतां तो म्हणाला माझें नांव कृष्णा.

एकनाथाचा निरुपाय झाला. कृष्णा ब्राह्मण एकनाथाच्या घरीं राहून त्यांचीं सारीं कामें करूं लागला. पुजेची सारी तयारीहि त्यानें करून द्यावी. अशा रीतीनें त्यानें सतत बारा वर्षे एकनाथांची सेवा केली.

त्यानंतर एकनाथ महाराजांस या गोष्टीची जाणीव झाली. देव भक्तासाठीं काय वाटेल ते करण्यास तयार असतो. एकनाथांचें या जगांतील कार्य पूर्ण झालें. मग उगाच या जगांत रहाण्यांत काय फायदा ? एके दिवशीं भगवंताच्या नांवाचा जयजयकार करीत ते सर्व लोकांसमवेत मिरवणुकीनें गोदावरी काठीं गेले व तेथें सर्वांचा निरोप घेऊन त्यानीं जलसमाधि घेतली.




## जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्ड, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स, ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# भक्तांचे रक्षणकर्ते बाबा

—लेखक : द. मा. सुर्वे

सन १९५८ च्या सप्टेंबर पर्यंत मला बाबांच्याविषयीं कांहींच माहिती नव्हती. फक्त एका मित्राजवळ बाबांचा फोटो पाहिला होता. ( ते नेहमी खिशांत डायरीच्या कप्यांत ठेवीत ) व त्यांनीं फक्त हा साईबाबांचा फोटो आहे, एवढेंच सांगितलें होतें. पण त्यांच्याविषयीं कांहींच माहिती सांगितली नाहीं. इतकेंच काय? पण मला श्रीसाईबाबांचे ठिकाण कोठें आहे हेंहि माहीत नव्हतें.

माझी देवदेवता व साधूसंतांवर श्रद्धा आहे हें त्या मित्रांना माहीत होते. ( मी नियमित देवपूजा व प्रार्थना जशी जमेल तशी करतों. ) याच सुमारास आमच्याच खात्यांतील एक मित्र आले व त्यांनीं श्रीसाईबाबांचा प्रसाद आणला होता व त्याचवेळीं त्यांनीं श्रीबाबांविषयीं थोडी माहिती सांगितली व शिर्डी हें गांव कोठें आहे व कसें जावें हेंहि सांगितलें. त्यांना त्याचवेळीं बढती मिळाली होती व ते शिरडीला जाऊन दर्शन करून आले होते. त्यांच्या बढतीमध्यें विघ्न येण्याचा संभव होता व त्यांना तसें पक्कें वाटत होतें म्हणून त्यांनीं बाबांना नवस केला कीं 'बाबा माझा हक्क मला मिळाला कीं मी प्रथम तुमच्या दर्शनास येईन' व त्याप्रमाणें त्यांना बढती मिळाली व ते शिरडीला जाऊन आले. त्यांनीं सांगितल्यापासून मलाहि बाबांची भक्ति करण्याची इच्छा झाली. ते मित्र निघून गेल्यावर माझे पहिले मित्र ( ज्यांच्या जवळ मी फोटो पाहिला होता ) मला म्हणाले कीं, तुम्हीं साईबाबांचा फोटो आणून पूजा करीत जा म्हणजे तुमचे पैसे लवकर मिळतील.

माझी पगारवाढ पुष्कळ वर्षांपासून मला मिळत नव्हती. कांहीं कारणास्तव रोखून ठेवली नव्हती, तर माझी बदली निरनिराळ्या ठिकाणीं झाल्यामुळें माझी पगार वाढीची गोष्ट तशीच राहिली व ज्या ज्या ऑफिसमध्यें अर्ज केला तिकडून उत्तर मिळे कीं अमूक आफीसकडे लिहिलें आहे अशा स्थितींत ७–८ वर्षें गेलीं नंतर २–३ वर्षें वाट पाहून मग मी अर्जावर अर्ज देवूं लागलों व प्रकरण इकडून तिकडे तिकडून तिसरीकडे असें चालू झालें; पण मुख्य गोष्ट पगार वाढ कांहीं मिळाली नाहीं. मला उत्तर मिळत होतें तुमची केस अमूक ऑफिसला पाठविली आहे, तिकडून आल्यावर–दुसरीकडे, असेंच चाललें होतें.

मी तावडतोब बाजारांतून श्रीबाबांचा एक फोटो जो मिळाला तो मागवून घेतला व लगेच पूजा करून नियमीत प्रार्थना करूं लागलों आणि दोन महिन्यांच्या आंत माझी पगारवाढ मला मिळाली व ज्या ऑफिसमधून वरचेवर जबाब मिळत असे कीं दुसऱ्या ऑफिसला केस पाठविली आहे त्याच ऑफिसमधून कांहीं

अडथळा न घेतां मंजूर झाली व माझ्या पगारांत एकदम ७०–८० रु. ची दरमहा वाढ झाली. त्या वेळेपासून माझी बाबांवरची श्रद्धा दृढ झाली व मग लवकरच १९५९ च्या फेब्रुवारींत मी शिरडीला जाऊन दर्शन घेतलें. त्याच वेळीं मी संस्थानचा सर्वसाधारण सदस्य झालों. त्या वेळेपासून रोज संध्याकळीं आरती व दर गुरुवारीं प्रसाद नियमीत होत असते. सर्व कुटुंब श्रीसाईबाबांचें भक्त आहे. मी आजपर्यंत ४ वेळ शिरडीला जाऊन आलों आहे व श्रीबाबांवर आमचा पूर्ण भरंवसा आहे.

मी शक्यतों लोकांना श्रीसाईबाबांना शरण जाण्यास सांगतों व त्याप्रमाणें कांहीं लोकांनीं अनुभव घेऊन आपले कल्याण करून घेतलें आहे. याबद्दल एक उदाहरण देत आहें.

आमच्या ऑफीसमध्यें एक अधिकारी नवीन बदलून आले. त्यांची माझी पूर्वीची थोडी ओळख होतीच. माझ्या हाताखालींच काम करीत असल्यामुळें पुष्कळ वेळां सल्ला घेण्याकरितां येत व असेंच एक दिवस बोलतां बोलतां म्हणाले कीं मला (त्यांना) मूत्राशयाचा त्रास होत होता व १–२ दिवसांपासून त्रास पुन्हां सुरु झाला आहे. मी त्यांना ताबडतोब डॉक्टरकडे जाण्याचा सल्ला दिला त्यावर ते म्हणाले कीं पुष्कळ डॉक्टर झाले परंतु कांहीं उपयोग नाहीं. १०–११ वेळ एक्सरे घेतला पण कांहींच उपयोग नाहीं. त्यावर मी त्यांना सांगितलें कीं जर तुमचा विश्वास असेल तर मीं अगदीं सोपा व बीनखर्चाचा उपाय सांगतो. त्यांनीं जें मी सांगेन तें श्रद्धापूर्वक करण्याचें कबूल केलें. त्यादिवशीं बहुतेक गुरुवार असावा. मी त्यांना सांगितलें कीं तुम्हीं श्रीसाईबाबांना शरण जा. एक फोटो आणून त्यांची मनोभावानें पुजा करा व रु. १–२५ शिरडीला पाठवा. प्रसाद व उदी येईल. नेहमीं उदीचा उपयोग करा. त्याप्रमाणें त्यांनीं त्याच दिवशीं फोटो आणला पतीपत्नीनीं मिळून बाबांची करुणा भाकली व आश्चर्यपूर्वक गुण आला, त्यांचा विकार बंद झाला. आज दोन वर्षे त्यांना पूर्ण आराम आहे. ते आता पक्के साईभक्त बनले असून गुरुवारचा उपास करतात. ( सुरवातीपासूनच त्यांनीं गुरुवारचा उपास सुरू केला होता ) व दरमहा रु. १। संस्थानकडे अभिषेक व प्रसाद करितां पाठवितात.

वरील दोन्ही उदाहरणांवरून 'शरण मज आला आणि वायां गेला । दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥' हे श्रीबाबांचे वाक्य सत्य आहे.

याशिवाय आम्हांला नेहमींच असें अनुभव येतात व आमची पूर्ण खात्री आहे कीं कशाहि प्रसंगीं बाबा भक्तांचें रक्षण करण्यांत मुळींच चुकत नाहींत.

आतां उदीविषयीं एक उदाहरण. एका मित्रानें आपल्या अनुभवावरून सांगितलें व एक अगदीं अलिकडेच प्रत्यक्ष आम्हांला आलेला अनुभव सांगत आहे.

आमच्या ऑफिसमधील एक क्लार्क साईभक्त आहेत. त्यानीं आपला अनुभव सांगितला तो असा :—

त्यांची लहान मुलगी फारच आजारी होती. डॉक्टरांचें औषध चालू होतें. परंतु पोटांत औषध टिकत नव्हतें दूध सुद्धां टिकत नव्हतें. लहान मूल कांहींच बोलूं शकत नव्हतें. सर्वजण चिंतातूर असतांच त्यांचे एक मित्र आले. त्यांना मुलीची परिस्थिति सांगितली. त्यावर ते म्हणाले, 'अरे तूं साईबाबांचा भक्त आहेसना मग त्यांस शरण जा व मुलीला उदी दे' यावर त्यांनीं विचारलें कीं, कोण साईबाबा? कारण त्यांना कांहींच माहित नव्हतें. त्यावर त्यांच्या मित्रानें समोरच असलेल्या कॅलेंडरकडे बोट दाखवून म्हणाले, कीं अरे या कॅलेंडरवर ज्यांचा फोटो आहे तेच साईबाबा व त्यांनी श्री बाबांबद्दल सर्व माहिती थोडक्यांत सांगितली त्यांच्या गोष्टी चालल्या असतां आमच्या मित्राची आई आंत बसून ऐकत होती. तिनें तावडतोब बाबांची प्रार्थना करून घरांतीलच थोडी उदी मिसळून मुलीला पाजली व तें औषध मुलीच्या पोटांत टिकलें व तिला त्याच वेळेपासून आराम पडूं लागला. त्यावेळेपासून ते बाबांचे भक्त बनले.

दुसरा अनुभव घरचाच आहे व तो अगदीं ताजा २ महिन्यापूर्वीचा आहे. सविस्तर लिहीत बसण्यापेक्षां मी मुद्याचीच गोष्ट सांगतों.

दोन महिन्यापूर्वीपासून घरचें पत्र नाहीं म्हणून मी काळजींत होतों. सध्यां परप्रांतांत नोकरीनिमित्त आहें. एक दिवशीं घरचें पत्र आलें त्यांत सौ. नें लिहिलें कीं, "पत्रास वेळ लागण्याचें कारण चि. बेबी ही आजारी होती. ७–८ दिवसापूर्वी ती शाळेंतून येत असतां नाल्याजवळ बाहेरची (पिशाच) हवा लागली व तिला एकदम ताप आला नुसती पडून होती. औषधोपचार केले कांहीं गुण नाहीं. तिच्यां आंगावरून उतारा काढून टाकला, तेव्हां जरा बरें वाटलें पण नुसती पडून होती व डोळे बंद असत. नियमित बाबांची उदी लावली पण यावा तसा गूण नव्हता म्हणून मग सर्व उपाय बंद करू बाबांची उदी दिवसांतून तीन वेळ खाण्यास दिली व अंगालाहि लावली. तिला तावडतोब गुण येऊन आराम वाटला. आतां तिची प्रकृति चांगली आहे. काळजी करण्याचें कारण नाहीं."

या सर्व अनुभवांवरून बाबांची कृपा व उदीचा प्रताप याविषयी संशय घेणाराचें समाधान करणें अशक्य; पण ज्यांचा विश्वास आहे त्यांना फळ मिळणारच.

---

मौन चार प्रकारचें असतें. कांहीं न बोलणें, डोळ्यांना कामास न लावणें, कानांचा उपयोग न करणें व मनाची धांवपळ थांबविणें. या सर्वांत मनाचें मौन साधणें महा कठीण आहे. परंतु तें शांत करतां आलें पाहिजे.

—रमण महर्षि

# ‘ कृष्ण भक्तिचा रंग ’

—संत विनोबा

दुनिया पैदा करावी अशी ब्रह्मदेवाला इच्छा झाली. त्याप्रमाणें आतां वहण
व्हावयाची, इतक्यांत त्याच्या मनांत काय आलें कोण जाणें! त्याला वाटलें,
“आपल्या कामांतील बरें-वाईट सांगणारा कोणी तरी असला तर मोटी मौज होईल.”
त्यामुळें आधी त्यानें एक चांगला तरबेज टीकाकार बनविला. “ह्यापुढें मी जें काय
काढीन त्याची तपासणी करण्याचें काम तुझें” असा त्या टीकाकारास अखत्यार
देण्यांत आला. इतकी तयारी झाल्यावर ब्रह्मदेवानें आपला कारखाना चालू केला.
ब्रह्मदेव एक एक चीज बनवित गेला आणि टीकाकार तिच्यांतली चूक दाखवून
आपल्या जन्माचें चीज करूं लागला. टीकाकाराच्या चाचणीपुढें बिनचूक म्हणून
कांहीं निघेच ना. “हत्तीला वर पाहतां येत नाहीं, उंट वरच पाहतो. गाढवांत चपळ-
पणा नाहीं. माकड अचपळ” अशा रीतीनें टीकाकाराची टांकसाळ सुरू झाली. तो
आपला शेरे मारत गेला; ब्रह्मदेवाची अक्कल गुंग झाली; तरी त्यानें शेवटचा प्रयत्न
करून पाहण्याचें ठरविलें आणि कारागिरीची कमाल करून ‘माणूस’ घडून काढला.
टीकाकार निरखून पाहूं लागला. अखेर चूक निघालीच. ‘ह्याच्या छातींत एक खिडकी
पाहिजे होती. म्हणजे ह्याचे विचार सगळ्यांना समजले असते.” ब्रह्मदेव म्हणाला,
“तुला बनविलें हीच माझी एक चूक आहे आतां मी तुला शंकराच्या ताब्यांत देतो.”

ही एक जुनी गोष्ट कुठेंशी वाचलेली आहे. तिच्या विषयीं शंका घेण्याला फक्त
एकच जागा आहे. ती ही कीं, गोष्टींत सांगितल्याप्रमाणें हे टीकाकार शंकराच्या
ताब्यांत गेलेले दिसत नाहींत. कदाचित् ब्रह्मदेवाला त्यांची दया आली असेल किंवा
शंकरानें आपली शक्ति त्यांच्यावर चालविली नसेल. कसेंहि असलें तरी त्यांची जात
आज बरीच फैलावली आहे एवढें मात्र खरें. गुलामगिरीच्या काळांत कर्तृत्व न
उरल्यामुळें वक्तृत्वाला संधि सांपडते. कामाचें बोलणें खुंटलें कीं बोलण्याचेंच काम!
आणि बोलायला तरी रोज रोज नवीन विषय कोठून काढावयाचे? त्यामुळें एक
सनातन विषय ठरवून टाकला; “**निंदा-स्तुति जनांच्या। वार्ता वधू-वरांच्या.**”
पण निंदा-स्तुति म्हटलें तरी त्यांत वांटणी समजावयाची आहे. निंदा म्हणजे
पर-निंदा आणि स्तुति म्हणजे आत्म-स्तुति. ब्रह्मदेवानें टीकाकाराला बरें-वाईट
पहायला सांगितलें होतें. त्यानें स्वतःचें बरें पाहिलें, व ब्रह्मदेवाचें वाईट पाहिलें.
मनुष्याच्या मनाची ठेवणच अशी चमत्कारिक आहे कीं, दुसऱ्याचे दोष जसे
त्याला ठळठळीत दिसतात तसे गुण दिसत नाहींत. संस्कृतांत ‘विश्व-गुणादर्श-
चंपू’ म्हणून एक काव्य आहे. वेंकटाध्वरी नांवाच्या एका दाक्षिणात्य पंडितानें तें
लिहिलें आहे. त्या काव्याची कल्पना अशी आहे कीं, कृशानु आणि विश्वावसु

नांवाचे दोन गंधर्व विमानांत बसून फिरत आहेत आणि जें जें दृष्टीस पडलें त्याविषयीं चर्चा करीत आहेत. कृशानु दोष-दृष्टि आहे. विश्वावसु गुण-ग्राहक आहे. दोघे आप आपल्य दृष्टीनें वर्णन करीत आहेत. 'गुणादर्श' म्हणजे 'गुणांचा आरसा' असें काव्याचें नांव ठेवून कवीनें आपलें 'निर्णायक मत' विश्वावसूच्या बाजूला दिलें आहे. तरी एकंदर वर्णनाची घाटणी अशा थाटाची झाली आहे कीं शेवटीं वाचकांच्या मनावर कृशानूच्या मताचीच छाप पडते. गुण घेण्याच्या इरायानें लिहिलें तरी ही दशा. मग दोष पाहण्याची वृत्ति असती तर काय झालें असतें ?

चंद्राप्रमाणें हरएक वस्तूला शुक्ल-पक्ष आणि कृष्ण-पक्ष आहेत. त्यामुळें टीकाखोर मनाला स्वैर-संचार करण्यास हरकत येण्यासारखी नाहीं. सूर्य दिवसां दिवाळी करीत असला तरी "रात्रीं अंधारच देतो" एवढ्या वाक्यानें त्या सर्व दिवाळीची होळी होऊं शकेल. त्यांतून अवगुणच घ्यावयाचा नियम ठरला म्हणजे दोन दिवसांमध्यें एक रात्र न दिसतां एका दिवसाभोंवतीं दोन रात्री दिसावयाच्या. मग अग्नीच्या ज्योतिकडे लक्ष न जातां धुरावरून अग्नीचें अनुमान करणारें न्यायशास्त्र निर्माण व्हावयाचें. भगवंतांनीं ह्या सर्व मौजा गीतेंत सांगितल्य आहेत. अग्नीचा धूर, सूर्याची रात्र किंवा चंद्राचा कृष्ण-पक्ष पाहणाऱ्या 'कृष्ण-भक्तांचा' त्यांनीं एक स्वतंत्र वर्ग केला आहे. दिवसां डोळे मिटले म्हणून अंधार आणि रात्रीं डोळे उघडले म्हणून अंधार. असा स्थित-प्रज्ञाच्या कार्यक्रमाबरहुकूम ह्या लोकांचाहि कार्यक्रम आहे. पण भगवंतांनीं स्थितप्रज्ञाला मोक्ष दाखविला आहे तर ह्यांची रवानगी कपाळमोक्षाकडे केला आहे. पण इतकें झालें तरी ही संप्रदाय एखाद्या सांथीच्या रोगाप्रमाणें वाढतच चालला आहे. बुबुळें काळीं असल्यामुळें म्हणा किंवा काळ्यारंगांत आकर्षण अधिक असल्यामुळें म्हणा, काळी बाजू जशी आमच्या डोळ्यांत भरते तशी उजळ बाजू भरत नाहीं. अशा स्थितींत हा सांप्रदायिक रोग कोणत्या औषधानें बरा होईल हें पाहून ठेवणें जरूर आहे.

पहिलें औषध म्हणजे चित्तांत मुरलेल्या ह्या 'कृष्ण-भक्तीला' बाहेरचा कृष्ण दाखवूं नये. आंतला कृष्ण दाखवावा. जगांतला काळेपणा पाहण्यास सवकलेल्या नजरेला आपल्या मनांतला काळेपणा दाखवावा. विश्वाचे गुण-दोष परीक्षण करूं पाहणारा माणूस बहुधा स्वतःस निर्दोष मानून बसलेला असतो. हा त्यांचा भ्रम दूर झाला म्हणजे त्यांच्या परीक्षणाची नांगी आपोआप मोडून जाईल. बायबलच्या नव्या करारांत ह्याविषयीं एक सुंदर प्रसंग वर्णिला आहे.

कोणा बाईच्या हातून कांहीं दुर्वर्तन झालें असेल. त्याची चौकशी करून त्या बाईला योग्य न्याय देण्यासाठीं 'महाजन'-मंडळ बसलें होतें. श्रवणभक्तहि बरेच जमा झाले असतील हें सांगण्याची जरूरच नाहीं. पण त्या बाईच्या सद्भाग्यानें खिस्तदेवांना तेथें खेंचून आणलें होतें हें विशेष. पंचांनीं निकाल फर्माविला; "बाईनें घोर अपराध केला आहे. सर्वांनीं दगड मारून तिला शरीरांतून मुक्त करावें."

निकाल ऐकतांच माणसांचे हात सरसावले आणि आसपासचे दगड थरथर कापूं लागले. ख्रिस्तदेवांना त्या दगडांची दया आली. त्यांनीं उभे राहून सर्वांना एकच वाक्य सांगितलें; "ज्याचें मन अगदीं चोख असेल त्यानें पहिला दगड मारावा." मंडळी क्षणभर स्तब्ध राहिली. मग हळूं हळूं एकेकजण तिथून चालतां होऊं लागला. शेवटीं ती अभागी बाई आणि ख्रिस्तदेव दोघेच उरले. त्यांनीं तिला थोडा बोध करून प्रेमानें निरोप दिला

ही आख्यायिका निरंतर ध्यानांत वागवावी.

**'कासया गुणदोष वानूं आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ?"**

दुसरें औषध मौन. दुसऱ्याचा दोष दिसूंच नये ह्यासाठीं पहिलें औषध आहे. नजरचुकीनें दोष दिसल्यानंतर हें दुसरें औषध खास उपयोगाचें आहे. ह्यानें मनाची आंतल्या आंत तडफड चालेल. दोनचार झोंपा कमी होतील. पण शेवटीं थकून जाऊन मन शांत होईल. तानाजी पडल्यावर मावळे लोक पळ काढणार असा रंग दिसूं लागला. तेव्हां ज्या दोराच्या मदतीनें ते गडावर चढले होते आणि ज्याच्या मदतीनें ते आतां उतरण्याचा प्रयत्न करणार होते तो दोरच सूर्याजीनें कापून टाकला. "तो दोर मीं मघांच कापून टाकला आहे" ह्या सूर्याजीच्या एका वाक्यानें लोकांत निराशेची वीरश्री संचारली आणि गड सर झाला. दोर कापून टाकण्याचें तत्त्वज्ञान फारच महत्त्वाचें आहे. त्याविषयीं निराळेंच लिहावें लागेल. संध्यांचा मुद्दा इतकाच कीं मौनानें दोर कापून टाकल्यासारखें होतें. दुसऱ्याचा दोष पाहण्याचें विसरून तरी जा, नाहींतर तडफडत बैस अशी मनावर पाळी येते. आणि तसें झालें म्हणजे मग सगळा रस्ता सरळ होतो. कारण, ज्याला जगावयाचें असतें त्याला फार वेळ तडफडत बसणें सोयीचें होत नाहीं.

तिसरें औषध कर्म–योगांत गढून जाणें. सूत कांतण्याचा कर्म–योग स्वीकारला म्हणजे लोकनिंदेच्या गोष्टी किसत बसण्याला अवकाशच राहत नाहीं. ज्याप्रमाणें शेतकऱ्याला धान्याच्या एकेक कणाची खरी किंमत समजते, त्याप्रमाणें सूत कांतणाऱ्याला क्षणाचें महत्त्व कळतें. "रिकामा जाऊं नये क्षण" ही समर्थांची सूचना किंवा "क्षणार्ध देखील व्यर्थ घालवूं नये" हा नारदांचा नियम काय सांगत आहे, हें सूत कांततांना अक्षरशः लक्षांत येतें. कर्मयोगाचें सामर्थ्य अजब असल्यामुळें त्यावर जितका जोर देतां येईल तितका थोडा. ही मात्रा अनेक रोगांवर लागू आहे; पण ज्या रोगाची उपाययोजना आतां चालली आहे त्यावर तिचा अद्भुत गुण अनुभवलेला आहे.

तीन औषधें सांगितलीं. तिन्ही औषधें रोग्याच्या तोंडाला कडू तर लागतील; पण तीं परिणामीं अतिशय मधुर आहेत. आत्मपरीक्षणानें मनाचा, मौनानें वाणीचा आणि कर्म–योगानें शरिराचा दोष झडून गेल्याशिवाय आत्म्याला आरोग्य मिळणार नाहीं. एवढ्यासाठीं औषध कडू म्हणून सोडतां येत नाहीं. शिवाय हें औषध मधांतून घ्यावयाचें आहे. त्यानें कडूपणा जिरून जाईल. सर्वांभुतीं भगवद्भाव हा मध आहे. त्यांत ह्या तीन मात्रा उगाळून घ्याव्या म्हणजे सगळेंच गोड होईल.

# संत मृत्युंजय

**बेदरच्या गादीवर ज्यांनीं अधिकार चालविला त्यांत शांत-ब्राह्मणी नांवाचा बादशहा मोठा वैराग्यपर होऊन गेला. त्याला मोठ्या चमत्कारिक प्रसंगानें उपरती होऊन सद्गुरूचा लाभ झाला. न्याय, नीति यांना वंद्य समजून शांतब्राह्मणी राज्य चाल-वीत असतां त्याच्या राज्यांत एक भणंग प्राप्त झाला.**

एके दिवशीं शांतब्राह्मणी आपल्या प्रिय कांतेसह दिवाणखान्यांत विलास करीत बसला होता. वाड्यामध्यें कोणाचा प्रवेश होऊं नये म्हणून त्यानें देवडीवर रखवालदार ठेवले होते. बायकोशीं सुखानें गप्पा मारीत मारीत राजा उत्कृष्ट केळीं भक्षण करीत होता. त्यानें राणीलाहि चार केळीं खाण्यास दिलीं. तिनें तीं केळीं सोलून त्याच्या साली खाली टाकून दिल्या. यासमयीं ते दोघे खिडकींत बसले होते. केळीं खात असतां राणीनें सहज खालीं नजर टाकिली तों तो भणंग खालीं टाकलेल्या केळ्याच्या सालीं चोखीत आहे, असें तिच्या नजरेस पडलें. राणीनें राजाला तो वेडा दाखविला. आपण दारावर अटक ठेविली असतां त्या वेड्याचा आंत प्रवेश झाला याबद्दल राजा कोपाविष्ट झाला. त्यानें तात्काळ द्वारपाळांस पाचारण केलें आणि त्यांना कडक शिक्षा केली. त्या वेड्यामुळेंच आपणाला दंड झाला हें जाणून द्वारपाळांनीं खालीं येतांच त्या भणंगाला लाथांनीं तुडविण्यास सुरुवात केली. शिपायांच्या लाथा खात असतां तो वेडा हंसतच होता. हा प्रकार पाहून बादशहानें त्या वेड्यास वर बोलावून विचारलें, 'द्वारपाळ तुझ्या पाठीवर लत्ताप्रहार करीत असतां तूं खुशाल हंसत आहेस हें कसें?' या प्रश्नावर त्या भणंगानें जबाब केला, 'राजा, मला तुझ्या कर्माबद्दल हसूं आलें. मी नुसत्या साली खाल्ल्या तर मला लत्ताप्रहार मिळाले; तुम्हीं तर आंतील मगज भक्षण केला तेव्हां तुम्हांला आतां काय दंड होईल न कळें. मी तुझ्या राजवाड्याच्या अंगणांत क्षणभर वास्तव्य केलें तर माझी पाठ लाथांनीं मऊ झाली, तूं तर सदैव या वाड्यांतील मंदिरांत विलास करतोस तेव्हां तुझी गति तरी होणार काय? तुझ्या भावी दुःखाबद्दलच मी हास्य केलें."

भणंगाचें भाषण ऐकतांच राजाची वृत्ति पालटली. त्यानें राज्यसंपत्तीचा त्याग केला आणि कोणास न कळवितां तो अरण्यांत निघून गेला.

आपल्या जन्माचें साफल्य करण्याकरितां आपण काय योग साधावा, कोणता देहदंड करावा, मानसपूजा कशी करावी वगैरे कोणत्याही गोष्टीचा त्याला उमज पडेना. सत्समागमावांचून आपलें कांहींच कार्य पार पडणार नाहीं असें वाटून तो उद्विग्न मनानें अरण्यवासांत असतांना त्याची व आषाढीच्या यात्रेकरूंची गांठ पडली. सत्समागमामुळें त्याला आनंद वाटून तो त्यांच्याबरोबर पंढरीस गेला. पांडुरंगाची

मूर्ति पाहून त्यानें साष्टांग नमस्कार घातला. आपल्याला सद्गुरूची प्राप्ति व्हावी म्हणून त्यानें पांडुरंगापुढें धरणें घेतलें. त्यानें अन्नपाणीहि वर्ज केलें.

याप्रमाणें तीन रात्री लोटतांच पांडुरंगानें स्वप्नांत येऊन त्याला असें सांगितलें कीं, 'कल्याणांत सहजानंदस्वामी राहतात त्यांचा तूं अनुग्रह घे.' इतकें सांगून पांडुरंगांनीं त्याला विवेकसिंधूचें पुस्तक दिलें. माझगी जागा झाला तों पंढरीनाथ अदृश्य झालेले असून विवेकसिंधूचें पुस्तक मात्र शेजारीं पडलें आहे असें त्याला दिसलें. त्यानें तो प्रासादिक ग्रंथ उचलून घेतला. तेव्हांपासून एकांतांत तो त्या पुस्तकाचें वाचन व मनन करूं लागला.

दृष्टांत झाल्याप्रमाणें तो सद्गुरूच्या दर्शनाकरितां कल्याणास गेला. त्यावेळीं सहजानंद तेथें नव्हते. त्यामुळें खट्टू होऊन तो पंढरपुरास परत आला. त्या ठिकाणीं अकस्मात् सहजानंदस्वामींची भेट होऊन त्यानें त्यांना स्वप्नांतील मजकूर सांगितला. स्वामींनीं त्याला उपदेश देऊन त्याचें मृत्युंजय असें नांव ठेविलें. सद्गुरूच्या अधिकारयुक्त वाणी-तून निघालेल्या बोधामृतानें मृत्युंजयास साक्षात्कार होऊन तो विज्ञान स्थितीप्रत पोहोंचला.

त्या ठिकाणीं भवराय नांवाचा कोणी भाविक जंगम होता. त्याजवर कृपा करून मृत्युंजयानें त्याला दीक्षा देऊन आपला शिष्य केलें. भवरायानें यवनाचा उपदेश घेतला म्हणून लोकांत त्याची निंदा सुरूं झाली. समुच्चय नांवाचा जंगम हा त्या निंदकांचा मुख्य होता. तो आपणा स्वतःस फार श्रेष्ठ समजत असे. गंगाजीवन पवित्र असलें तरी तें मद्यपात्रांतून सेवन करणें पापमूलकच होय. राजाची राख कितीही सुंदर, प्रेमळ व स्वच्छ असली तरी पुण्याहवाचनाच्या कामीं ती कुचकामाचीच होय. कोराकरकरीत जोडा दिसला तरी त्याला मस्तकावर धारण करणें गैरच आहे, अशी वचनें लढवून त्या समुच्चय जंगमानें यवनापासून उपदेश घेणें निषिद्ध ठरविलें आणि सर्व जातीकडून भवरायाला वाळींत टाकिलें.

आपल्यावरील बहिष्कारामुळें भवराय फार दुःखित झाला. त्यानें मृत्युंजयाजवळ आपलें गाऱ्हाणें सांगितलें. मृत्युंजयानें त्याला सांगितलें, "स्तुति व निंदा यांस वश न होतां आपण आपलें कर्तव्य सावधपणानें बजाविण्यांतच आत्मकल्याणाची किल्ली आहे." गुरूच्या आज्ञेप्रमाणें विकल्प व द्वेष धरणारांच्या वचनांस झुगारून देऊन भवराय स्वस्थ चित्तानें ईश्वरभजन करीत राहिला,

याच सुमारास काशीपती राजानें भोजनाचा एक मोठा समारंभ केला. तो शिवभक्त असल्यामुळें नेहमी जंगमांचें भोजन करी. यावेळीं त्यानें दहा हजार जंगमांना आमंत्रण दिलें. जंगमांना पाटावर बसवून त्यानें त्यांची पूजा केली. पात्रांवर घृतशर्करामिश्रित मिष्टान्न वाढल्यानंतर राजानें जंगमांना शिवाला नैवेद्य दाखविण्यास सांगितलें. सर्व जंगमांनीं आपापले रुमाल सोडिले तों सर्वांच्याच गळ्यांतील लिंगें नाहीशीं झालेलीं! हा विपरीत प्रकार पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. ब्राह्मणाचें यज्ञोपवीत हरवलें असतां तो जसा

लजित होतो तद्वत् ते सर्व जंगम लज्जायमान झाले. लिंग धारण करण्याच्या वेळेच्या शपथेनुसार सर्वजण देहान्त प्रायःश्चित्तास लायक ठरले. शंकरानें आपला त्याग करण्याचें कारण काय असावें म्हणून अनेकांचे अनेक तर्क चालू झाले; पण त्यांतील कोणताच कायम होईना. अखेर खुद्द काशीपती बोलला "तुम्हांतून कोणीतरी साधुपुरुषाचा छळ केला असावा. संतछळामुळेंच तुम्हांवर ईश्वराचा क्षोभ झाला असावा.'

राजाच्या कल्पनेवरून त्यांनीं आपापल्यांत तसा शोध चालविला. तेव्हां समुच्चय जंगमाला भवरायाच्या छळाची आठवण झाली. त्यानें राजाला आपली कृति निवेदन केली आणि आपल्या पापाच्या निष्कृतीचा उपाय विचारिला. राजानें त्यांना संकटनिवारणार्थ मृत्युंजयाचे पाय धरण्यास सांगितलें. राजाच्या सूचनेवरून ते सर्व जंगम मृत्युंजयाच्या मठांत जाऊन त्याच्यापुढें लोटांगणें घालूं लागले. भवरायाच्या निंदेबद्दल त्यांनीं मृत्युंजयाजवळ क्षमा मागितली. त्यांची नम्रता पाहून मृत्युंजय म्हणाला "माझ्या घरीं वेदांत व सिद्धांत या नांवाचे दोन कुत्रे आहेत. त्यांनीं तुमचीं लिंगें पळवून आणलीं असावीं." असें सांगून मृत्युंजयानें वेदांत–नांवाच्या कुत्र्यास हाका मारतांच एक कुत्रा तेथें प्रगट झाला. मृत्युंजयानें आज्ञा करितांच त्या श्वानानें पांच हजार लिंगें ओकून टाकिलीं. नंतर सिद्धांत पुकारून त्याच्याकडूनही बाकीची पांच सहस्र लिंगें मृत्युंजयानें ओकवून दाखविलीं.

हें कौतुक पाहून जंगमांना आश्चर्य वाटलें. हरिभक्ताचें सामर्थ्य पाहून ते चकित् झाले. दहाहजार लिंगांतून कोणासही आपापलें लिंग ओळखून घेतां येईना. असंख्य चिलियांतून स्वतःचा चिलिया निवडून घेतांना जशी श्रियाळाची अवस्था झाली त्याचप्रमाणें त्या जंगमाची अवस्था होऊन ते गर्वरहित होऊन मृत्युंजयास शरण गेले. मृत्युंजयाची कृपा होतांच तीं सर्व लिंगें आपण होऊनच ज्याचीं त्याजपाशीं गेलीं. नंतर राजाच्या घरीं भोजनपंक्तीचा अपूर्व थाट होऊन हरिहराच्या नांवाचा जयघोष केला.

---

**ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स**

**३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स**

# मुसलमान संत अनगडशहा

लेखक : **नारायण त्र्यंबक जवारकर**, धुळे

तुकाराम महाराजांच्या वह्या 'तूं ब्राह्मण नाहींस' तुला वेदांत अभंगांतून बोलण्याचा अधिकार नाहीं, असें सांगून, देहू नजीक इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या व तुकारामाचा योग्य बंदोबस्त केला अशा तोऱ्यांत मोठ्या थाटानें रामेश्वरशास्त्री वाघुलीस गेले. वाघुलीहून पुण्यास नागनाथाचे दर्शनासाठीं विजय संपादल्याचें आनंदांत निघाले. पुण्याजवळ माध्यान्ह स्नान, संध्या उरकण्याचे हेतूनें, अनगड शहाचे बागेंत पुष्करणीवर थांबले. आपल्याला मोठा जय तुकाराम महाराजांचें बंड मोडण्यांत झाला म्हणून आपलें दैवत नागनाथ याचें दर्शन घ्यावे म्हणून ते आले होते. त्यावेळीं अनगड शहा वस्तींत पीठ मागणेंकरतां गेला होता. ही पुष्करणी व अनगड शहाचा तकया अजूनहि गुळ आळींत (पुण्यांत) पाहण्यास सांपडतात. अनगड शहा पीठ घेऊन परत आले, तेव्हां रामेश्वरभट पुष्करणींत स्नान करीत होते. ते रामेश्वरास म्हणाले आज जुम्मा है; मेरी निमाज कीं वखत हो चुकी है; और तुमतो पुष्करणी मे तिरते हो; है! हे ऐकून रामेश्वर भट म्हणाले, 'जा मूर्खा! तुझ्या सारख्याचें शब्दसुद्धां आम्हीं स्नानसंध्या करतांना ऐकूं नयेत.' हे ऐकून अनगडशहा म्हणाले, 'अच्छा! ऐसेहि तिरते रहो!' हे फकीर मोठे तत्त्ववेत्ते होते व उच्च कोटीला पोहोंचलेले अवलिया होते. त्यावेळीं पुण्यानजीक मोरया गोसावी, तुकाराममहाराज व हे फकीर असे तीन तत्त्ववेत्ते जगदोद्धाराचें कार्य करीत होते. अनगडशहाचें शापानें रामेश्वर भटाचे अंगाचा पाण्यांतून बाहेर येतांच दाह सुरूं झाला. अंगांवर ओलीं वस्त्रें ठेऊन ते आळंदीस गेले. या फकिराच्या मंत्र विद्येचा माझ्यासारखे वेदवेत्या ब्राह्मणावर असा विपरीत परिणाम व्हावा याचे रामेश्वरांना आश्चर्य वाटले व ज्ञानेश्वरांपुढें वेद मंत्रांचे पारायण करून या फकिराचे शापापासून निवृत्त होऊं अशी त्याची खात्री होती. पण ज्ञानेश्वरमहाराजांनीं दृष्टांत देऊन देहूस तुकाराम महाराजांस शरण जा असें सुचविलें. त्यांचा तुमचे हातून जाणून बुजून अपमान झाला आहे व त्याचमुळें अनगड शहाचे शापाला सत्यता आली. एरवी वेद वेत्या सदाचारी ब्राह्मणावर मंत्र विद्येचा परिणाम होत नसतो. सत्पुरुष हे अपराधाची क्षमाच करीत असतात. तेव्हां ताबडतोब देहूस जा. असे ज्ञानेश्वरांकडून आज्ञापत्र होतांच, रामेश्वर भट भंडाऱ्या डोंगरावर तुकाराम महाराज ईश्वराच्या भजनांत दंग झाले होते. त्यांचेकडे जाऊन त्यांचें पाय धरलें. त्यांनीं लागलीच तो आपला छळ करणारा असतांहि त्यांना उचलून उराशी धरलें व सर्वांगावरून हात फिरवून देवाची करूणा भाकली. रामेश्वराचा दाह कमी झाला. हें सामर्थ्य व अधिकार कळून आल्यावर त्यांनीं विद्वत्तेचा अभिमान टाकून महाराजांचा अनुग्रह घेतला.

वाघुलीस परत जातांना मार्गांत अनगडशहाची गांठ पडली तेव्हां "भटजीमहाराज दाह कमी होण्यास कोणता उपाय केला" असें विचारलें; पण भयानें भटजी उत्तर न देतां निघून गेले. माझ्या वाणींतून जे आलें ते मात्र मानवी प्रयत्नानें कमी होणार नाहीं. हा भटजी ब्राह्मण सिद्ध पुरुष आहे. मोरया गोसावी ब्राह्मण त्यांचें कृपेनेंच हें झालें असेल व तें खरेखोटें पाहाण्यासाठीं तें चिंचवडला गेले. मोरया गणपतीपूजनांत निमग्न होते. अनगडशहानें दारांत उभे राहून 'कटोरा भरदे' असा मोठ्यानें सवाल केला. मोरया गोसावी म्हणाले, "माझ्या धर्मविधिप्रमाणें मला पूजेंतून उठतां येत नाहीं, म्हणून तुमच्या-सारख्या तत्ववेत्त्या फकिराला येथूनच वंदन करतों. त्याचा स्वीकार व्हावा." हे ऐकून अवलियांना संतोष झाला व ते म्हणाले 'अच्छीमहाराज' हम और तुम ये कहांसे लाया! दुनयामे अल्लाइलाहि भरा है. हें ऐकून मोरया गोसाव्यांना पराकाष्ठेचें समाधान वाटलें व म्हणाले, तुमचें म्हणणें सत्य आहे. मला माझें शास्त्र हेंच सांगत आहे. पण व्यवहारांत तत्व न ढळूं देतां व्यवहारी भाषाच बोलली पाहिजे. द्वैत हें पृथ्वीचें पोषक आहे. या भाषणानें अनगडशहास समाधान वाटलें. व ते म्हणाले "कुच हरजा नाहीं; आटा लाव. शिष्यानें घरांतील सर्व पीठ घातले पण कटोरा भरेना तेव्हां आपला हा ब्रम्हांडांचा कटोरा माझ्या दुबळ्याचें घरीं निःसंशय भरणार नाहीं. हें ऐकून अनगडशहा हांसून म्हणाले, माझें कार्य झालें. मी आपलें सत्व पाहिलें यांची मला माफी करा. त्यांनीं कटोऱ्यांतील पीठ शिष्यास परत देऊन मोरया गोसाव्यास मोठ्या आदबीनें आदब करून, रामेश्वर भटाचा दाह शमन करणेचें कृत्य त्यावेळचें तिसरे तत्ववेत्ते श्रीतुकाराममहाराजच असावें असें मनांत आणून देहूकडे निघून गेले. श्रीतुकाराममहाराज भंडाऱ्यावर होते. घरापुढें उभें राहून "भरदे कटोरा भरदे" असा नेहमीचा सवाल म्हटला स्वभावाप्रमाणें जिजाबाईनें त्यांस शिव्या देण्यास सुरवात केली पण श्री तुकाराम महाराजांची चार पांच वर्षांची मुलगी "भागू" इनें एक चिमूटभर पीठ आई नाहीं म्हणत असतां अनगडशहाचे कटोऱ्यांत टाकलें व आश्चर्य कीं तो कटोरा पिठानें भरून गेला. अनगडशहानें त्या मुलीला आनंदाने उचलून हृदयाशी धरले व म्हणाले तूं कोणा अधिकाऱ्याची मुलगी आहेस. संत तुकारामाची मी मुलगी आहे असें मोठ्या अभिमानानें तिने सांगितलें. रामेश्वराचा दाह तुकाराममहाराजांचें कृपेनेंच शमन झाला यांत शंका नाहीं अशी त्याची खात्री झाली. मुलीचा अधिकार अवर्णनीय आहे. ते लागलीच भंडाऱ्या डोंगरावर गेले व तुकाराममहाराजांचे पायांवर लोळण घातली. व म्हणाले तुमचे पांच वर्षांचें मुलीनें माझें डोळ्यांत चांगलेंच अंजन घातलें. खरी फकिरी वृत्ती माझे ठिकाणीं बाणण्यास मी कोणतें साधन करूं तें सांगा. तेव्हां तुकाराममहाराज म्हणाले, आपण थोर विभूती अहा. आपणांस तें साधन टाऊक नाहीं असें कसें म्हणावें? सिद्धत्याचा अभिमान आड येतो. तो अभिमान टाका. आणि सदाचारी राहून सर्व अभिमान परमेश्वराचें निष्काम

भजन करा. म्हणले सर्व होते. हे चोघामृत प्राशन केल्यावर मोठ्या आनंदानें पुन्हां महाराजांस वंदन करून अनगडशाहा निघून गेले.

या दोघा सत्पुरुषांच्या वर्तनांत जगाला धडा घेण्यासारखें तत्त्व उत्पन्न होत आहे. म्हणून जरा विस्तृत हकीकत दिली आहे. यांचा विचार आधुनिक काळांत हिंदु मुसलमानांनीं अवश्य करावा; म्हणजे उभयतां समाजांत जी यादवी सुरू होते तिला चांगलाच आळा बसेल.

धर्म हा ज्याचा त्याला प्यारा आहे. स्वधर्मात राहून आपलें ऐहिक पारमार्थिक कल्याण साधुन घ्यावें. परधर्म भयावहः असें आमची गीता जगाला शिकविते. ज्यांनीं त्यांनीं आपआपल्या धर्माप्रमाणें वागावे हेच या चरित्रावरून ठरते व तेच श्रीसाई-बाबाचे सांगणें आहे.

---

—महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय व गरिबांचे कैवारी मुख्य मंत्री श्री. दादासाहेब कन्नमवार हे एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून निधन पावल्याचें लिहिण्यास अत्यंत दुःख होत आहे.

—राष्ट्राध्यक्ष केनेडी हे शुक्रवार ता. २२ रोजीं दुपारीं टेक्ससचे राज्यपाल श्री. जॉन कॉनेली यांच्यासह उघड्या मोटरगाडीनें डलसच्या ( टेक्सस ) गजबजलेल्या रस्त्यांवरून जात असतां त्यांच्यावर अज्ञात इसमानें गोळ्या झाडल्या. श्री. केनेडी यांना तावडतोब "पार्कसाईड हॉस्पिटल"मध्यें नेलें गेलें. त्यांचे प्राण वांचविण्याचे आटोकाट प्रयत्न झाले, पण कांहीं उपयोग न होऊन रुग्णालयांत नेल्यापासून अवघ्या पंचवीस मिनिटांनीं ते निधन पावले.


# MATUNGA CLEANING WORKS

**ESTD. 1934** *Prop.* **S. V. PRADHAN**

MODI NIWAS, BOMBAY 19

**Washers, Dyers and Dry Cleaners.**

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

**माटुंगा क्लीनिंग वर्क्स**

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक : एस्. व्ही. प्रधान

# तो क्षण साधा !

लेखक : प्रभाकर श्री. जठार

'देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधीयेल्या ॥

होय; क्षणभरच देवाच्या दाराजवळ थांब म्हणजे तुला चारी मुक्ति मिळतील. पण हा क्षण कोठला ? मिनीटाचा सहावा भाग काय ? नाहीं हा क्षण म्हणजे तुझ्या सत्त्वपरीक्षेचा अंतिम क्षण. ह्या वेळेला तुझी, तुझ्या मनाची व आत्म्याची चलबिचल होऊं देऊं नकोस. डोंबाच्या घरीं हरिश्चंद्राला हुकूम मिळाला. तूं ह्या तुझ्या बायकोचें मुंडकें उडव. ज्या क्षणानें ठरवावें लागलें कीं पोटच्या मुलांचें बलिदान देऊन राष्ट्रांचा व राजाचा वंशवेल वांचविला पाहिजे. तो क्षण तो सत्त्वपरीक्षेचा. सत्वशील, आत्मरूप, आत्मस्वरूप करणारा. आत्मापरमात्मा ह्यांच्यांतील भेदाची भिंत नाहींशी करणारा क्षण. आत्मा–परमात्मा रूप एक करणारा क्षण. गंगेची कावड रामेश्वराला नेतांना एकनाथाला भुरळ पाडणारा तो क्षण. तापलेल्या वाळवंटांत पाण्यासाठीं तडफडणाऱ्या गाढवाला पाणी पाजूं कीं रामेश्वराच्या पिंडीवर गंगाजलाच्या पाण्याची शीतल धार धरूं ? हें विचार करावयास लावणारा तो क्षण. तुम्ही साधलांत तर चारीच मुक्ती काय, पण साक्षात् मुक्तीराम व्हाल. क्रिस्ताच्या जीवनांत आलेला तोच क्षण ज्यावेळीं क्रुसावर खिळे ठोकून मरणाची सजा मिळाली कां तर पृथ्वीवर मानवतेचें, सत्याचें व प्रेमाचें राज्य असावे हा हट्ट जर त्यानें सोडला असतां व त्याकालीन धर्मगुरूंच्यांत तो मिसळावयास तयार झाला असतां तर नाना सुखाचा सागर त्यांच्यासाठीं तयार होता. " Even Jesus was tempted " पण तो महापुरुष त्या क्षणाला फसला नाहीं. तोच क्षण ज्यावेळीं गौतमानें मागें वळून आपली पत्नी यशोधरा व पुत्राकडे शेवटचें पाहिलें व त्याला वाटले आपल्या पुत्राचें शेवटचें चुंबन घ्यावें तोच क्षण—मोहाचा क्षण त्यानें संयम केला म्हणून सिद्धार्थ गौतम झाला.

"भोळा भाव तडीस जाय" खरें आहे पण आपण खरोखर येवढे भोळे आहोंत काय ? देवा तूं जर हा नैवेद्य खाल्ला नाहींस तर मी डोकें फोडून प्राण देईन असा नामदेवासारखा निरागस भाव आपणांत आपला आहे काय ? नसला तर तसा आणण्याचा प्रयत्न करा. कारण मोहरी एवढी जरी तुमची श्रद्धा असली तरी तुम्ही इकडचा पहाड तिकडे करूं शकाल "हा क्षण ज्यावेळेला तुम्हांला थोडीच कां होईना ब्रह्माची गोडी दाखवून जाईल तोच क्षण तुम्हीं साधा."




## ऑक्टोबर १९६३

या महिन्यांत बाहेरगांवची भक्तमंडळी श्रीसाईंचे दर्शनाकरितां पुष्कळच आली होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें:—

**कीर्तन :** श्री. डॉ. के. बी. गव्हाणकर मु. कुर्ला ( मुंबई ).

सं. गवई विठ्ठलराव मराठे यांची या महिन्यांत आश्विन व॥ ११ व कार्तिक शु॥ ११ अशीं दोन कीर्तनें श्रींचे मंदिरांत झालीं.

**गायन :** श्री. तुळशीरामबुवा दिक्षीत कुर्ला, मुंबई श्री. मारुतीबुवा वागडे, मुंबई. सौ. मिराबाई राजगोपाळ नायडू खार, मुंबई. श्री. जगन्नाथबुवा सुरतकर साकोरी. श्री. वसंत शास्त्री देशमुख साकोरी. श्री. रामचंद्र कृष्ण रानडे पुणें, श्री शंकरराव सप्रे, नागपूर. कु. शशिकला साठे पुणें. श्री. रामचंद्र दगडे पुणें. श्री. कृष्णराव वऱ्हाडकर, मुंबई. सौ. प्रेमलता वसंत बेंदुर, मुंबई.

**पोवाडे :** शाहीर बाबुराव धुळेकर कलापथक प्रचारक पुणें.

**तबला वादन :** श्री. संतू नारायण पवार मुंबई, श्री. चंद्र प्रकाश आचारी ठाणें.

**कथ्थकीनृत्य, कालियानृत्य :** कुमारी विणा जाधव, कुमारी निलांबरी जाधव, दादर मुंबई.

**बँडवादन :** श्रीशिवाजी क्रिडा मंडळ मुंबई.

कोजागिरीनिमित्त श्रीचे मंदिरांत कीर्तन, गायन, भजन, चंद्रपुजा, श्रीचे पादुकास तुळशी अर्चन तीर्थ प्रसाद वगैरे व ( जागर )

× × × ×

दिपवाळीनिमित्त श्रीलक्ष्मी सरस्वती पूजन हस्तें श्री. जाधव ( मालक साईप्रसाद भोजनगृह ) शिर्डी तसेंच दिव्यांची रोषनाई, शोभेची दारू वगैरे झालें.

कार्तिकी महाएकादशीनिमित्त श्रींचें मंदिरांत कीर्तन व श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक. टाळ–मृदंग भजनी दिंडी, गारुड वगैरे झालें.

भारतांतील सर्वोच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती मुधोळकर साहेब व त्यांच्या पत्नी श्रीमती मुधोळकर उभयतानी श्रीची पुजा-अर्चा केली.

न्यायमूर्ती अभ्यंकरसाहेब व त्यांच्या पत्नी यांनीं कुटुंबांतील मंडळीसह श्रीची पुजा अर्चा केली. नामदार श्री. माने मजूरमंत्री महाराष्ट्र राज्य. ना. बेराळे, उपमंत्री महाराष्ट्र राज्य. खासदार हनुमंतय्यासाहेब माजी मुख्य मंत्री म्हैसूरराज्य व चॅरिटी-कमिशनरसाहेब महाराष्ट्र राज्य.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.

---

# श्री साईनाथ हॉस्पिटल

## ( मुंबई ऑफिसकडे आलेल्या हॉस्पिटल-फंड देणग्या )

१-८-६२ ते ३०-९-६२

| नांव | | रु. न. पै. |
|---|---|---|
| श्री. आर. एम. वकिल | मुंबई | ५५१-०० |
| ,, किशोर पंड्या | ,, | २०१-०० |
| ,, वि. वि. दातार ( पवई ) | मुंबई | २००-०० |
| ,, एन. आर. मिस्त्री | ,, | १०१-०० |
| ,, एस. राघोजी | गुलबर्गा | १००-०० |
| ,, आर. डी. शहा | मुंबई | ४५-०० |
| श्रीमती मेहरू पी. सिघवा | ,, | २५-०० |
| श्री. एस. सुमती भगवंत | रायपुर | २५-०० |
| श्री. एस. एच. चंडक | खामगांव | २१-०० |
| श्रीमती सरस्वतीबाई चंडक | ,, | १५-०० |
| श्री. जयकुमार चंडक | ,, | १३-०० |
| ,, विजयकुमार चंडक | ,, | ११-०० |
| ,, डब्ल्यु. एच. कोठारे | मुंबई | २०-०० |
| सौ. इंदिरा दांडेकर | रायपूर | १०१-०० |
| मिसेस पेरिन पी. सिघवा | मुंबई | २०-०० |
| श्री. प. म. बावरे | चिंचणी | १६-५० |
| ,, बी. के. पाटील | डिम्रस | १२७-०० |
| ,, यु. पी. पद्मनामन | मुंबई | २२-०० |
| ,, उ. द. नाडकर्णी | ,, | २०-०० |
| ,, अल्ला मालिक | मुंबई | ११-२५ |

| | | |
|---|---|---|
| ,, एल. जी. व्यास | मद्रास | ११–०० |
| ,, सी. एस. जोशी | मुंबई | ५–२५ |
| ,, आर. एन. कवळी | ,, | ५–०० |
| ,, हेमांशु मि. टिपणीस | ,, | ५–०० |
| ,, वि. द. वैद्य | ,, | ५–०० |
| ,, एन. एच. म्हात्रे | ,, | ११–०० |
| ,, एम. जी. भट | ,, | ५–०० |
| ,, शिवचंद गुप्ता | रतलाम | २५–०० |
| ,, पी. रामदास | येल्लारेड्डी | ५–०० |
| ,, एस. ए. नायडू | न्यु दिल्ली | ५–०० |
| ,, पी. आर. जोशी | बालाघाट | ११–०० |
| श्री. आर. व्ही. एच. पटेल | कॅलसबरी | ८००–०० |
| ,, जी. आर. पटेल | नॉर्थन्टन यू. के. | ६६–२६ |
| ,, लि. पा. शाह | नैरोबी | ३३–१३ |
| श्रीमती जे. दया | जोहान्सबर्ग | ६–६२ |
| श्री. बटुकभाई दवे | दारेसलाम | ६–६३ |
| श्रीमती मनरंजनी डी. मरोली | न्यासलंड | २७–०० |

---

मौन हेंच उच्च प्रतीचें वक्तृत्व होय. शांत रहातां येणें हीच सर्वांत मोठी हाल-चाल आहे हें कसें? मौन संभाळतां येणें हेंच सर्वांत बिकट आहे. सर्व शक्तींचा व्यय आहे. सर्व इंद्रियांवर ताबा ठेवावा लागतो. इंद्रियदमन त्यासाठीं उपयोग करावा लागतो. सर्व इंद्रियांवर ताबा ठेवावा लागतो. इंद्रियदमन हें सर्वांत महत्त्वाचें आहे. ती मोठ्यांत मोठी सिद्धि आहे.

—रमण महर्षि


※ उत्कृष्ट कागद ※ आकर्षक रचना

※ स्वच्छ व सुबक छपाई

**बॉम्बे सेंट्रल प्रेस**

मुरलीधर टेंपल कंपाऊंड, ठाकुरद्वार पोस्टाशेजारीं

जगन्नाथ शंकरशेट रोड, ठाकुरद्वार मुंबई २

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S Anantha Raum | ३–०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality | | by Pradhan | १–०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality | (Telgu) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगाशेकरकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस–दिल्ली | २–५० |
| (१०) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | स्तवन–मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | Spiritual Symphony | | by R. S. Harshid Mehta | २–५० |
| (२१) | Side lights on Sai Baba | (Eng.) | Calcutta | ००–७५ |
| (२२) | Guide to Shirdi | (English) | | ००–१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1–00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00–37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00–50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi, Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

ालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी
माणसाला मंत्रमुग्ध करते,
त्याचप्रमाणें कुठल्याहि
हृदयंगम चित्राची मुद्रणकृति
वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

**५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई**
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक ; श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,